एऑन प्ले साठी
स्कॅन करा




# आधुनिक केसरी

**विश्वव्यापी मराठी दैनिक**

मंगळवार, २८ नोव्हेंबर २०२३

## आता वाचा

# एऑन प्ले

प्लॅटफॉर्मवर

# AEONPLAY

## एऑन प्ले ॲप डाउनलोड करा

आणि अमर्याद माहिती व मनोरंजनाचा आनंद घ्या









न्युज पेपर | लाईव्ह न्युज चॅनल | एंटरटेनमेंट









शॉपिंग | हेल्थकेअर | एज्युकेशन

**सर्व काही एका ॲपमध्ये समाविष्ट**

www.aeongroup.in




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


योगप्रकाश या मासिकाचा नुकताच आलेला दिवाळी अंक हातात घेतला. त्यातील सुरुवातीच्या एका जाहिरातीने लक्ष वेधून घेतले. त्या जाहिरातीत वरच्या बाजूला ज्यांनी आयुष्यभर योगाचा प्रचार आणि प्रसार केला, त्या जनार्दन स्वामींचा फोटो होता आणि त्याखाली ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील काही ओव्या दिल्या होत्या. त्या ओव्यांनी मला मोहिनी घातली आणि मग दिवसभर, रात्रभर त्याच ओळी माझ्या मनात घर करून राहिल्या. दिवाळी तर नुकतीच संपली आहे, पण माउलींच्या या ओळी कधीही वाचल्या तरी ज्ञानाची आणि आनंदाची दिवाळी अक्षय दिवाळी अनुभवाला येते. त्या ओळी अशा आहेत...

जेणे जग हे समस्त । आंत बाहेरी पूर्ण भरित ।
जाले आहे दीपजात । तेजे जैसे ।।
तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागी ।।

माउलींच्या या ओव्या म्हणजे जीवनाचे आणि परमार्थाचे सारच ! ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीला आणि पसायदानात सुद्धा माउली ज्या सर्वात्मक ईश्वराला प्रार्थना करतात, त्याच सर्वात्मक म्हणजे सर्वांच्या ठायी असलेल्या ईश्वराला या ओव्यांमध्ये काय आवडते ते अर्जुनाला या ठिकाणी भगवान सांगतात. तो ईश्वर या जगात सर्वत्र आणि सर्वांच्या हृदयी विद्यमान आहे. त्याने हे जग व्यापले आहे. ईश्वर जगात सर्वत्र कसा आहे हे सांगताना माउली फार सुंदर सुंदर दृष्टांत देतात. ते म्हणतात की दिव्याचा प्रकाश जसा सर्वत्र पसरतो, तसाच परमेश्वर सगळीकडे हे जग व्यापून राहिला आहे. दिव्याच्या प्रकाशाने दशदिशा उजळून निघाव्या आणि अंधार नष्ट व्हावा, तद्वतच ईश्वर आतबाहेर सर्वत्र व्यापून राहिला आहे.

मग या सर्वात्मक ईश्वराला काय आवडते आणि त्याची पूजा कशी करावी हे माउली पुढच्या ओळीत फार सुंदर सांगतात. ते म्हणतात, ' त्या सर्वात्मक ईश्वराला हे अर्जुना, स्वकर्म कुसुमांनी केलेली पूजा फार आवडते. त्याने त्याला अपार संतोष होतो. ' कौरव आणि पांडवांमध्ये जेव्हा युद्ध सुरु होणार असते, तेव्हा अर्जुन किंकर्तव्यमूढ होतो. आपले धनुष्यबाण टाकून देतो. खरं म्हणजे अर्जुनावर हा युद्धाचा काही पहिलाच प्रसंग नाही. यापूर्वी अनेकदा त्याने आपल्या पराक्रमाचे दर्शन घडवले होतेच. पण या युद्धाच्या वेळी समोर आपले आप्त, गुरु आदींना पाहून मी यांच्याशी कसा युद्ध करू, त्यांच्यावर शस्त्र कसे चालवू हा प्रश्न त्याला पडला. त्याच्या या प्रश्नाचे निराकरण करण्याकरताच भगवंतांनी त्याला गीतेचा उपदेश केला.



## आनंदी पहाट

## जीवनातील शिक्षणाचे महत्व मोलाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षण आपल्या सर्वांच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आणि आपल्या सर्वांसाठी आपल्या सर्वोच्च क्षमतेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा करते. जेव्हा आपण जीवनातील शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल बोलतो, तेव्हा शिक्षण म्हणजे काय हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जीवनातील आधुनिक शिक्षणाचे महत्त्व आणि त्याच्या अनेक पैलूंचा शोध घेत राहणे आवश्यक ठरत असते. शिक्षण हे एक माध्यम आहे, जे आपल्याला आपल्या समाज, कुटुंब आणि राष्ट्राप्रती असलेली कर्तव्ये जाणून घेण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि आदर करण्यासाठी कौशल्य तंत्र, माहिती आणि ज्ञान देते. त्यामुळे जीवनातील शिक्षणाचे महत्त्व कितीतरी पटीने मोठे आहे. जीवनातील शिक्षणाचे महत्त्व हे आहे, की ते प्रत्येकाला जगाकडे आणि आपल्या समाजाकडे पाहण्याचा एक चांगला दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करते. शिक्षण आपल्याला नवीन कल्पना मिळविण्यात, शोधण्यात मदत करते. शिक्षण माणसाला ज्ञान मिळवण्यास आणि जीवनात आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते. आपल्याला आपले करिअर आणि आपली वैयक्तिक वाढ सुधारण्यात मदत करू शकते. सुशिक्षित व्यक्तीच समाजाचा उत्तम नागरिक बनू शकते. आपल्याला जीवनात योग्य निर्णय घेण्यास मदत करते. आधुनिक, विकसित आणि औद्योगिक जग शिक्षणाच्या चाकांवर धावत आहे. स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी आपल्या सर्वांना शिक्षणाची मशाल म्हणून गरज आहे. अशिक्षित व्यक्तीला माणूस म्हणून आणि संपूर्ण जगाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव कधी होऊ शकतेच असे नाही. माणूस म्हणून, आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाला परत द्यायचे आहे आणि प्रत्येकासाठी राहण्यासाठी एक चांगले ठिकाण बनवायचे आहे. योग्य शिक्षण एखाद्या व्यक्तीला त्यांच्या आवडीच्या पलीकडे विचार करायला शिकवते आणि पुढील पिढीसाठी जगाला अधिक आनंदी, सुरक्षित स्थान बनवण्याची क्षमता विकसित करण्यात मदत करते.



आधुनिक केसरी

## अद्वैतात न्हाले | भक्तजन ||

कान्होबाच्या कृपे | झालो मी पावन ||
पापाचे क्षालन | झाले आज ||१||
प्रारब्धाचे भोग | सुखावले आता ||
संवाद ऐकता | गीताईचा ||२||
वृंदावनी वेणु | वाजवी मुरारी ||
राधा ही बावरी | मन झाले ||३||
सारथ्य भक्ताचे | करितो श्रीरंग ||
उभा पांडुरंग | विटेवरी ||४||
माधव केशव | द्वैत ना उरले ||
अद्वैतात न्हाले | भक्तजन ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितास नाडला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला । स्त्रीकारणें कामबुद्धी ॥५५॥
स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती ।
स्त्रीकारणें सायोज्यमुक्ती । तेहि तुछ्य मानिली ॥५६॥
येके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें ठेंगणें ।
जिवलगें तीं पिसुणें । ऐसीं वाटलीं ॥५७॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्धकार जीवन रहे, विन सत्संग दुराव ।
निज चरित्र सुधरे नहीं, दिब्य न हो स्वभाव
।।५४।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संगाशिवाय जीवन कुमार्गावर जाते आणि अंधःकार प्राप्त होतो. त्यामुळे आपले चरित्र सुधरत नाही आणि दिव्य स्वभाव प्राप्त होत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास


कसा ओळखला? जगातील अनेक भाषांमध्ये दासबोधाचा अनुवाद झाला आहे. समाजाविषयीच्या अपार तळमळीतून समर्थांनी विपुल वाङ्मय निर्मिती केली. रोखठोक विचार, साधी सरळ भाषा आणि स्पष्ट निर्भीड मांडणी ही त्यांची वैशिष्ट्ये होती. दासबोध,[६] मनाचे श्लोक,[७] करुणाष्टके,[८] भीमरूपी स्तोत्र,[९] अनेक आरत्या उदाहरणार्थ 'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची' ही गणपतीची आरती, 'लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा' ही शंकराची आरती, कांही पदे इत्यादी त्यांच्या लेखनकृती प्रसिद्ध आहेत. समर्थ रामदास स्वामींच्या आरत्यांनी घरांघरांत स्थान मिळवले आहे 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' ही संत नामदेवांनी लिहिलेली आरती प्रसिद्ध आहे. याचा अर्थ नामदेवांच्या काळात देवांच्या आरत्या मंदिरात म्हटल्या जात होत्या. पुढे मोगलांच्या आक्रमणामुळे देवांचे उत्सव बंद पडले, अनेक मंदिरे उद्ध्वस्त झाली. त्यामुळे आरती वाङ्मय जनमानसाच्या स्मृतीतून नाहीसे झाले. समर्थांनी या वाङ्मयाचे पुनरुज्जीवन केले. आपण ज्या विविध आरत्या म्हणतो, त्यांपैकी अनेक समर्थ रामदासांनी लिहिल्या आहेत. आपल्या अखंड प्रवासाच्या दरम्यान श्री समर्थ रामदास स्वामी श्रीक्षेत्र मोरगावला येऊन पोहोचले. येथे श्री मयूरेश्वराच्यासमोर उभे राहिल्यानंतर त्यांनी जोरात 'जय जय रघुवीर समर्थ' अशी आरोळी दिली. त्यावेळी महासाधू मोरया गोसावी महाराज यांचे चिरंजीव श्री चिंतामणी महाराज देव ( थोरले ) तेथे होते. श्री चिंतामणी महाराजांनी श्री समर्थांना विनंती केली की मोरया च्या समोर मोरया ची आरोळी असावी. ज्या कोणत्या देवतेच्या मंदिरात आपण असू त्या देवतेचाच जयघोष करायला हवा. मात्र श्रीसमर्थांनी ते न ऐकता वारंवार 'जय जय रघुवीर समर्थ" चाच नारा दिला, आणि एक चमत्कार घडला. अचानक श्रीसमर्थांचे डोळ्यास अंधारी आली. हे अजबच संकट आलेले पाहून श्री समर्थ श्रीगणेशांना शरण गेले. या संकटातून वाचविण्यासाठी त्यांनी मयुरेश्वराची करुणा भाकली. आर्तपणे त्यांनी जी साद घातली तीच आपण नेहमी "सुखकर्ता दुखहर्ता..." ह्या आरती रूपात म्हणत असतो. "सुखकर्ता दुखहर्ता..." ही श्री समर्थ रामदास स्वामी निर्मित आरती याच स्थानी, यानिमित्ताने निर्माण झाली. श्री समर्थांच्या आगमनाचा साक्षीदार म्हणून जसा हनुमंत राया मोरगाव येथे स्थापित आहे. तुळजापूरची भवानी माता ही तर समर्थांची कुलस्वामिनी. तिचे दर्शन घेतांना समर्थांना 'दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी' ही आरती स्फुरली. 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' ही मारुतीची आरती म्हणताना तर अंगात वीरश्रीचा संचार होतो.



## बद्ध आणि मुक्त यांतला फरक.

आधुनिक केसरी

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संताची चौकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात; त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते; ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे. ' मी भगवंताचा' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी, आपणच, बद्ध आहोत अशी भावना करून घेतली आहे म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वतः त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र ' माझा ' हात दुखावला किंवा 'माझ्या' पोटात



दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव ' माझा ' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो.

आपले मन विषयाच्या आनंदात रंगते, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो. परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख होते. म्हणून, आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ती करायला पाहिजे. भक्तीला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ती होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही, संसार सोडून वनातहि जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले ' हा मीपणा टाकून, 'मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे 'मी' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

३१७. ज्याप्रमाणे, मनाने ' मी देहाचा आहे ' अशी समजून झालेल्याने आपण देहरूप बनलो, त्याचप्रमाणे मनाने ' मी भगवंताचा आहे ' असे म्हणत गेल्याने आपण भगवद् रूप बनून जाऊ.

मंगळवार, २८ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १०९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 28 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-109 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# कुणबी दाखले रद्द करा : छगन भुजबळ

## शिंदे समितीने दिलेला अहवालदेखील आम्ही मान्य करणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे: ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी पुन्हा एकदा पुण्यात पत्रकार परिषद घेत शिंदे समिती बरखास्त करण्याची मागणी केली आहे. शिंदे समितीला मराठवाड्यातील दाखले तपासण्याची जबाबदारी देण्यात आली होती ती आता पूर्ण झाली आहे, त्यामुळे आता ती बरखास्त करावी, तसेच सध्या जे कुणबी दाखले देण्यात येत आहेत तेही रद्द करा अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच शिंदे समितीने दिलेला अहवालदेखील आम्ही मान्य करणार नाही, अशी भूमिका भुजबळ यांनी घेतली आहे.**

राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी जस्टिस दिपक शिंदे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या समितीवर टीकेचा बाण सोडताना आता तिची गरज राहिली नसून ती तत्काळ बरखास्त करण्याची मागणी केली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी जो अहवाल तयार केला आहे तो देखील स्वीकारणार नसल्याची भूमिका भुजबळांनी घेतल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

नुकतीच हिंगोली येथे झालेल्या सभेदरम्यान जस्टिस शिंदे समितीवर टीका करताना या समितीची गरजचे काय असा सवाल उपस्थित केला होता. शिवाय या समितीला मराठवाड्यातील निजामकाळात कुणबी नोंदी होत्या का हे शोधण्याची जबाबदारी दिली असताना त्यांनी राज्यातील इतर जिल्ह्यात देखील हे काम केलेच कसे, असा खडा सवाल उपस्थित केला आहे.



एकीकडे समिती बरखास्त करा ही मागणी लावून धरताना दुसरीकडे जे कुणबी दाखले देण्यात येत आहेत तेच रद्द करा अशी देखील मागणी भुजबळ यांनी केली आहे. यामुळे आता मराठा विरुद्ध ओबीसी वाद आणखी पेटण्याची शक्यता आहे. इतकचे नाही तर भुजबळांनी खोटी कागदपत्रे सादर करुन प्रमाणपत्र घेण्यात येत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसे पुरावेच थेट मुख्यमंत्र्यांना दिल्याचे म्हटले आहे.

दिवसेंदिवस भुजबळ विरुद्ध जरांगे वाद वाढत असताना विरोधकांनी मात्र राज्यातील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न कुणीही करु नये असे म्हटले आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी छगन भुजबळ यांना राज्यातील वातावरण बिघडू नये यासाठी काळजी घेण्याची विनंती केली आहे. मात्र छगन भुजबळ हे आपल्या मतांवर ठाम असल्याचे पाहायला मिळत आहे.

राज्यात मागील काही दिवसांपासून मराठा विरुद्ध ओबीसी निर्माण झालेला वाद दिवसेंदिवस वाढत जाण्याची दाट शक्यता आहे. आश्चर्याची बाब इतकीच आहे की छगन भुजबळ हे सध्याच्या कॅबिनेटमध्ये मंत्री आहेत. तरी देखील त्यांना आपल्या मागण्या सरकारसमोर ठेवण्यासाठी व्यासपीठाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे सध्याच्या मंत्रिमंडळात ओबीसी विषयावरुन सरकारमधील मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नाही का असा सवाल उपस्थित होत आहे.

# विद्यापीठात स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे बुधवारी सोळावे पुष्प

## डॉ. मिलिंद दुसाने यांचे बातमीचे बदलते स्वरूप या विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे सोळावे पुष्प छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने हे बातमीचे बदलते स्वरूप





या विषयावर गुंफणार आहेत. जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे बुधवार, दि. 29 नोव्हेंबर दु. 2 वा. होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. दिनकर माने यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मरणार्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक, प्रा.डॉ. संजीवकुमार सावळे, डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.

# दहा दिवसांत मराठी पाट्या लावा अन्यथा खळखट्याक स्टाईलने उत्तर : मनसे

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** मराठी पाट्यांच्या मुद्यावर मनसे पुन्हा एकदा आक्रमक झाल्याचं दिसून आलं. मनसैनिकांनी कुर्ल्यातील फिनिक्स मॉलवर धडक मारली आणि त्यांना समज दिली. येत्या दहा दिवसांत जर या मॉलमध्ये मराठी पाट्या दिसल्या नाहीत तर मनसे खळखट्याक स्टाईलने उत्तर देईल असा, इशारा देण्यात आला आहे. सोमवारी मनसेचे चांदिवली विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांच्या नेतृत्वाखाली कुर्ला येथील फिनिक्स मॉलमध्ये घुसून मराठी पाट्यांच्या मुद्यावर आंदोलन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वेळीच पोलिसांनी मनसैनिकांना अडवून ताब्यात घेतले. या वेळी मनसैनिक आणि मॉल प्रशासन यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन वातावरण काही वेळासाठी तापले होते. मात्र पोलिसांनी मनसैनिकांना ताब्यात घेतले. काही वेळाने मनसैनिकांना समज देऊन सोडण्यात आले. मात्र मनसेने फिनिक्स मॉलला दहा दिवसाची वेळ दिली आहे. अजूनही या मॉलमध्ये मराठी पाट्या लावण्यात आल्या नाहीत, ही त्यांची मुजोरी आहे. दहा दिवसात मराठी पाट्या लावल्या नाहीत तर दगडफेक करून असा इशारा मनसेचे विभाग अध्यक्ष महेंद्र भानुशाली यांनी दिला. दुकानांवर मराठी भाषेत पाट्या लावण्यासाठी उच्च न्यायालयाने दिलेली 25 नोव्हेंबरची मुदत संपली आहे. त्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झालीये. अंधेरी पश्चिमेकडील मनसे उपविभाग अध्यक्ष किशोर राणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंधेरी मार्केट मधील दुकानदारांना मराठी भाषेत फलक लावण्याचे आदेश दिलेत. तर दुसरीकडे ठाण्यात मराठी पाटी नसलेल्या शोरूमला मनसेने काळे फासले आहे. जर दुकानाचे नामफलक मराठीत झाले नाही तर मनसे स्टाईलने खळखट्याक करण्याचा इशाराच मनसेकडून देण्यात आला आहे, मनसेने सुरुवातीपासून मराठी पाट्यांवरुन आक्रमक भूमिका घेतलीय. त्यात कोर्टाने दिलेल्या डेडलाईन नंतरही राज्यात अजून काही ठिकाणी पाट्या मराठी भाषेत काहींनी केल्या नाहीत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या अल्टिमेटमनंतर ठाण्यात दुकानांच्या पाट्यासंदर्भात मनसेचे आंदोलन केले आहे.

# नागभीड-चंद्रपूर रेल्वे मार्गावर ट्रेनच्या धडकेत वाघीण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** २७ नोव्हेंबर रोजी ब्रम्हपुरी वनविभागातील नागभीड वनक्षेत्रा अंतर्गत नागभीड-चंद्रपूर रेल्वे मार्गावर ट्रेनच्या धडकेत वाघ (मादी) परिक्षेत्रातील उपक्षेत्र मिंडाळा नियतक्षेत्र मिंडाळा नागभीड-चंद्रपूर रेल्वे मार्गावर ट्रेनच्या धडकेत वाघ (मादी) अंदाजे वय ३-४ महिने मृत पावल्याची घटना घडली.

घटनेची माहिती मिळताच सदर घटनास्थळी मा. श्री जितेंद्र रामगांवकर, मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर, श्री बंडु धोतरे, (NTCA) प्रतिनिधी, श्री एस. बी. हजारे, सहाय्यक वनसंरक्षक, (तेंदु) ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी अतिरिक्त कार्यभार, श्री ए. आर. कन्नमवार, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) तळोधी, श्री एम. पी. तावाडे, क्षेत्र सहा. मिंडाळा, श्री ए. के. नेरलवार, छक्षेत्र सहा. नागभीड, श्री विवके करंबेकर, मानद वन्यजीव रक्षक ब्रम्हपुरी, श्री पवन नागरे, झेप निसर्ग संस्था नागभीड आदि घटनास्थळी पोहोचले. यांच्या उपस्थित मौका पंचनामा करण्यात आला. सदर वाघ वन्यप्राणी याला वनवसाहत परिसरात शवविच्छेदन करण्याकरिता आणण्यात आले. डॉ. समिरन शात्रुरकर सहा. आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. कु. ममता वानखेडे, पशुधन विकास अधिकारी ता. ल.प.स.चि. नागभीड, श्री एस. बी. हजारे, सहा. वनसंरक्षक (तेंदु) ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी अतिरिक्त कार्यभार, श्री ए. आर. कन्नमवार, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) तळोधी, श्री विवके करंबेकर, मानद वन्यजीव रक्षक ब्रम्हपुरी, श्री पवन नागरे, झेप निसर्ग संस्था नागभीड यांच्या उपस्थितीत वनवसाहत



परिसरात शवविच्छेदन करून दहन करण्यात आले. सदर घटनेच्या प्राथमिक वन गुन्हा नोदंविण्यात आलेला असुन मा. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त, चंद्रपुर तसेच मा. दिपेश मल्होत्रा उपवनसंरक्षक, ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करणे सुरू आहे. (श्री एस. बी. हजारे) वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), परिक्षेत्र नागभीड यांनी पत्रकाद्वारे ही माहिती कळविली आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

## महामानवाला नवी मानवंदना

आधुनिक केसरी

स्वातंत्र्याला पाऊणशे वर्षे उलटल्यानंतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयात शनिवारी एक इतिहास घडला. या न्यायालयाच्या आवारात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राज्यघटनाकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या संकुलात उभारण्यात आलेला हा केवळ तिसरा पुतळा आहे. या पुतळ्यात डॉ. बाबासाहेबांना वकिलाच्या वेषभूषेत दाखविण्यात आले आहे. तीन फूट उंचीच्या चबुतऱ्यावर बाबासाहेबांचा हा सात फूट उंच पुतळा आहे. त्यांनी वकिलाप्रमाणे गाऊन आणि बँड परिधान केला असून, त्यांच्या एका हातात राज्यघटनेची प्रत आहे. आत्तापर्यंत या परिसरात 'मदर इंडिया'चा पुतळा होता. तो भारतीय वंशाचे ब्रिटिश कलाकार चिंतामणी कार यांनी तयार केला होता. महात्मा गांधी यांचा दुसरा पुतळाही एका ब्रिटिश शिल्पकारानेच बनवला होता. मात्र, बाबासाहेबांचा हा पुतळा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे देशातील शिल्पकार कुमावत यांनी हरियाणातील मानेसरमध्ये घडविला आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या पुढाकाराने हा पुतळा उभारण्यात आला आहे. य़ा वेळी सरन्यायाधीश, केंद्रीय विधी व न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाळ, अनेक न्यायमूर्ती, नामवंत वकील उपस्थित होते. 'आज देशातील प्रत्येक नागरिक न्याय मिळण्याच्या स्थितीत आहे का हे आपण स्वतःलाच विचारले पाहिजे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांमुळे आम्हाला स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली. घटनेच्या प्रस्तावनेतही त्यांचा विशेष उल्लेख झाला आहे आणि हीच मूल्ये आमच्या राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांसाठी मार्गदर्शन करत आहेत,' असे या वेळी राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या. 'न्यायाचे उद्दिष्ट सर्वांसाठी सुलभ करून सर्वोत्कृष्टपणे पूर्ण केले जाऊ शकते. हे समानता देखील मजबूत करते. राज्यघटना दिन साजरा करताना आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की घटना हा शेवटी फक्त लिखित दस्तावेज आहे. ती त्याच वेळी जिवंत होते आणि टिकते जेव्हा घटना प्रत्यक्ष आचरणात आणली जाते. आपल्या राज्यघटनेप्रमाणेच आपले सर्वोच्च न्यायालयही इतर अनेक देशांसाठी आदर्श आहे. सशक्त न्यायव्यवस्थेमुळे आपल्या लोकशाहीचे भवितव्य हे कधीही चिंतेचे कारण ठरणार नाही,' असाही विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

## महिलांचा सन्मान फक्त संविधान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**मानवी स्वातंत्र्याची व उद्धाराची सुरवात खऱ्या अर्थाने संविधाना पासून होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचा स्विकार सर्वानुमते करून देशातील जनतेला खऱ्या अर्थाने मानवी स्वातंत्र्य मिळाले. जातीय विषमतेमध्ये माणसा माणसात भेद होताच परंतु संविधानाने सर्वांना समान करून जाती भेद, विषमते मधुन बाहेर काढून प्रत्येकाला माणूस बनवून भारतीय ओळख दिली. वर्ण व्यवस्थेमध्ये व जाती व्यवस्थेमध्ये एक वर्ण दुसऱ्या वर्णापेक्षा, एक जात दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ व कनिष्ठ माणले जायचे.**

वर्णव्यवस्था व जाती व्यवस्था मध्ये स्त्रियांना मात्र कायमच दुय्यम व हीन वागणूक मिळत गेली. भारताचा इतिहास बघितला तर स्त्रियांना पशुपेक्षा हीन समजून स्त्रियांना माणसिक व शारीरिक गुलाम तर बनवलेच परंतु शिक्षण, हक्क, व विकासाची सर्व साधने बंद करून स्त्रियांना केवळ शोभेची व उपभोगाची वस्तू समजून त्यांचा वापर केला जात होता.

स्त्रियांना एवढी हीन व दुय्यम वागणूक होती की स्त्रीयांना पती अगोदर जेवता येत नव्हते, आपली आवड निवड सांगता येत नव्हती, स्त्रियांनी कायम पुरुषांच्या अधिपत्याखाली राहून आपले जिवन व्यथित करण्याचा नियम होता. स्त्रियांचे एवढे गुलामीचे व लाचारी चे होते की स्त्रीयांना चौकट ही ओलांडून बाहेर पडण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना दुय्यम व हिन माणणारी संस्कृती एवढी खोल रुजली होती की स्त्रीचा जन्म होणे देखील पाप मानले जायचे. म्हणून स्त्रियांवर अनेक अत्याचार झाल्याचे आपण इतिहासात बघितलेच आहे. सतीप्रथा सारख्या अनिष्ट प्रथांनी तर महिलांच्या जिवनाला दुःखाचे दुकान बनवले होते. जिवंत स्त्रीला जाळणे यात कोणता पुरूसार्थ आणि कोणती संस्कृती? तरीही असा असह्य वेदना स्त्रीया सहन करत होत्या. घरात मुलीच्या जन्मापासून तर मरेपर्यंत प्रत्येक ठिकाणी मुलीला मुलीची जाणीव करून देऊन मुलगी दुय्यम, कमकुवत व हीन कशी आहे याची जाणीव तिला करून दिली जात होती. म्हणून घरात वावरताना ही मुला मुलींना वेगवेगळी शिकवण दिली जायची. मुला मुलींच्या खेळण्याच्या भांड्यापासुन बोलण्या पर्यंत सर्व संस्कार वेगवेगळे केले जायचे. अशा स्त्रीच्या दयनीय जिवनाला सोन्यापेक्षा जास्त महत्त्व व मान सन्मान दिला तो संविधानाने. प्रत्येक ठिकाणी स्त्रियांना दुय्यम व हीन वागणूक मिळत असतानाही संविधानाने प्रत्येक स्त्री ला समान हक्क अधिकार व मान सन्मान बहाल केला. संविधानाने दिलेल्या सन्मानामुळेच आज महिलांचा सामाजिक सन्मान होत आहे. नाहीतर आजही घरात किंवा वैयक्तिक जिवनात स्त्रियांचा सन्मान करण्याचे धाडस पुरुष प्रधान संस्कृती ची झुल घातलेल्या लोकांना करता येत नाही. सर्वात अगोदर सन्मान म्हणजे काय हे ही समजने आवश्यक आहे. सन्मान म्हणजे स्त्रि पुरुष भेद न करता महिलेला सुद्धां स्वतंत्र अस्तित्व आहे व महिला लेखील पुरुषांप्रमाणे समाजातील घटक आहे त्यांना पुरुषांप्रमाणेच सर्व काही मिळाले पाहिजे याला सन्मान म्हणतात. घरात माणसा समोर उभे राहण्याची, निर्णय घेण्याचा अधिकार नसताना पुरुषांना जे हक्क अधिकार आहेत तेच हक्क अधिकार महिलांना देऊन संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांचा सर्वोच्च सन्मान केला. शिक्षण, नोकरी, पगार, पात्रता यामध्ये पुरुष व स्त्रि मध्ये कुठेही भेद न करता पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना बसवने हि क्रांतीच आहे. आणि हि क्रांती संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. नेहमीच स्त्रियांना माणसाच्या डाव्या हाताला बसवून वारंवार तिला संस्काराच्या माध्यमातून हिनतेची वागणूक मिळत होती परंतु संविधानाने महिलांना राष्ट्राध्यक्ष, प्रधानमंत्री, राज्यपाल, जिल्हाधिकारी सारख्या महत्वाच्या पदावर तर बसवलेच परंतु बसण्याची पुरुष व स्त्रियां मध्ये भेद केला नाही. दर्शनी भागात मोठ्या खुर्चीवर बसून सन्मान घेण्याचा बहुमान संविधानाने च दिला. याची जाणीव असायला पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण, चुल आणि मुल इथपर्यंत मर्यादित केलेल्या महिलेला साता समुद्रापार जाऊन शिक्षण नोकरी व व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने बहाल केले म्हणून आज स्त्रियांना प्रगती पथावर दिसत आहेत याला खरा सन्मान म्हणतात. स्त्रिने पिता, पती पुत्र यांच्या छत्र छायेखाली राहून स्वतः चे संरक्षण करून घेण्याची प्रथा संविधानाने बंद करून आता संविधानामुळे स्त्रीया देशाचे संरक्षण करत आहेत. हे विसरून चालणार नाही. स्वतः च्या मनाने स्त्रियांना कोणतेही काम करता येत नव्हते. परंतु आता अनेक स्त्रियां शासन प्रशासनात सल्लागार समितीमध्ये आहेत हा बहुमान केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानामुळेच आहे हे विसरून चालणार नाही. स्त्रियांना पिता व पती यांच्या संपतीवर कोणताही हक्क सांगता येत नव्हता, स्त्रियांना स्वतः च्या मताने आपला जोडीदार निवडता येत नव्हता, स्त्रियांना शिकवणे तर पाप मानले जायचे एवढे सारे हजारो वर्षांपासून सुरू असताना ही पिता व पतीच्या संपतीचा वाटा, आपल्या आवडीने जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य, व पुरुष घेतील ते शिक्षण घेण्याचा अधिकार संविधानाने दिलाच आणि पगार व सर्व सुख सुविधा अगदी कोणताही भेद न करता पुरुषांप्रमाणेच मिळवून देऊन खऱ्या अर्थाने महिलांचा सन्मान संविधानाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. विधवा पुर्नविवाह, मुल दत्तक घेण्या सारखे अधिकार महिलांना देऊन महिलांच्या जिवनाचे खऱ्या अर्थाने सोनं केले. पशुसम असलेल्या जिवनाला सोन्याचे दिवस बनवणाऱ्या संविधानाचे महिलांवर खुप उपकार आहेत. परंतु महिलांना त्याची जाणीव नाही. संविधानाची सर्वात मोठी व वंदनीय बाब म्हणजे संविधानाचा जय जय, संविधानाचे नाव कोणी नाही घेतले तरीही संविधान त्या व्यक्तीवर अन्याय होऊ देत नाही. एवढे महान संविधान आहे. वडिलांच्या नावावरची संपत्ती भावाच्या नावावर करताना बहीणीची जी सही लागते ती डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानामुळे. म्हणून संपती भावाच्या नावावर करायला जाताना, भावाच्या घरी विषेश पाहुणचार खाताना एकदा तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संविधानाची आठवण यायला पाहिजे. कारण तुमच्या एका सहीला एवढी किंमत केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाने मिळवून दिली. संविधान नसते तर जन्माला आल्यावरच मारून टाकले असते नाहीतर नवरा गेल्यावर जिवंत जाळले असते कारण येथे स्त्रियांना व स्त्रियांच्या जिवाची पर्वा करणारी व्यवस्था च नव्हती ती व्यवस्था संविधानाने प्रस्थापित केली. एका स्त्रीने एखाद्या चांगल्या वा वाईट पुरुषांशी लग्न केले तर त्या पुरुषांचे गुण दोष बघुन स्त्रियांचे स्थान ठरत होते परंतु आज. नवरा कितीही वाईट, व्यसनाधीन असेल तरीही स्त्रियांच्या कर्तृत्वावर पुरूषांचा मान सन्मान ठरतो हे केवळ भारतीय संविधानामुळे. आज मोकळ्या वातावरणात मनात येईल तसे फिरता येते, आवडीचे कपडे घालता येतात, पुरुषांच्या बरोबरीने बाहेर खाता येते ही मानसिक स्वातंत्र्य भारतीय संविधानाने दिलेले आहे. संविधान नव्हते तर नवऱ्या समोर ही पदर खांद्यावर ही घेण्याची मुभा नव्हती. पुरुषांप्रमाणे शिक्षण, पगार ह्या गोष्टी तर मिळताच परंतु स्त्रियांना प्रसुती साठी सहा महिने पगारी सुट्ट्या मिळतात हे सर्व संविधानामुळेच. नाही तर घरामध्ये प्रसुती पर्यंत आणि प्रसुतीनंतर एका महिन्यात महिलांना काम करावेच लागते. परंतु संविधान महिलांना सहा महिने पगारी सुट्टी देऊन सन्मान करते. महिलांवर काही अन्याय अत्याचार झाला तर घरातील लोक ही साथ देत नाहीत. उलट महिलेला च दुषणे देऊन तिचे माणसिक खच्चीकरण करतात. परंतु संविधानाने महिलांचे संरक्षण करून महिलांचे नाव व ओळख गुपीत ठेवून तिच्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराचे वास्तव समजून घेतले जाते व दोषींना शिक्षा केली जाते. आता सत्तेचा गैरवापर करून आरोपींना पाठीशी घातले जाते तो भाग वेगळा परंतु संविधानाने महिलांच्या सुरक्षतेची पुर्ण जबाबदारी घेतली आहे. महिलांचे शैक्षणिक, सामाजिक जिवनमान उंचवण्यासाठी वेगवेगळ्या योजना तयार करून महिलांना प्रवाहात आणण्यासाठी शासनाला जबाबदारी संविधानाने दिलेली आहे. म्हणजे शिक्षण घेत असताना मुलींना सायकल भेट, कपडे, आर्थिक साहाय्य, अशा स्वरुपाच्या योजना आणि महीलांचे सामाजिक स्थान वाढवण्यासाठी व छोटे मोठे उद्योग सुरू करण्यासाठी शिलाई मशीन, ब्युटीपार्लर साठी आर्थिक सहाय्य करून महिलांना सक्षम करण्यात येते. वरील सर्व गोष्टी महीलां साठी केल्या जातात. वरिल गोष्टी करताना कुठेही जातीचा उल्लेख नाही. याचा च अर्थ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व संविधान हे एका जातीची खाजगी संपती नसुन देशाच्या प्रत्येक नागरिकांचा उद्धार करणारे आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी काय केले असे म्हणणाऱ्यांनी केवळ एकदा संविधानाच्या अगोदरचा व संविधानाच्या नंतरच्या परिस्थिती चा तुलनात्मक अभ्यास करावा म्हणजे लक्षात येईल. ज्यांना स्वतः चा, स्वतः च्या पुर्वजांचा तुलनात्मक अभ्यास करता येत नाही त्यांनी उगीच राष्ट्रप्रेमाचा देखावा करून नये. संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले तरच राष्ट्रभावना कळते. संविधान न कळता राष्ट्रभावना जागृत करणे म्हणजे वैचारिक मागासलेले पणाचे लक्षण होय. आपली वैचारिक, सामाजिक व बौद्धिक पातळी वाढवून खऱ्या अर्थाने राष्ट्र प्रेम सिद्ध करायचे असेल तर महिलांनी एकदा तरी संविधान वाचून महिलांचा सन्मान व अस्तित्व कोणी निर्माण करून दिले. याबद्दल जागृत होणे आवश्यक आहे. संविधान दिनांच्या समस्त भारतीयांना मंगलमय सदिच्छा..

## दीर्घकालीन हितासाठी दूरदृष्टीच लाभदायक ठरते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**क्षणिक पाहिलं तर क्षणिक हित नक्कीच होईल पण दीर्घकालीन हित अपेक्षित असेल तर मग मात्र दूर दृष्टी ठेवलीच पाहिजे.संघर्ष संकटं अडचणी या शिवाय जीवन पुर्ण होत नाही.प्रत्येक बाबीकडे आपण कसं पाहतो हे जीवनात खूप महत्वपूर्ण आहे.अल्प कालावधीच हित साधायचं असेल तर जवळच पाहायला हरकत नाही पण दिर्घकालीन हितासाठी मात्र दुरदृष्टी लाभदायक ठरते हे वास्तव आहे.जशी दृष्टी तसे परिणाम अल्प दृष्टी ठेवून जवळच पाहिलं तर क्षणिक लाभ होण्याची शक्यता असतेच या मध्ये शंका नाही.आपल्या जीवनाची दशा आणि दिशा दृष्टी ठरवत असते.जन्मापासून शेवटच्या क्षणा पर्यंत क्षणोक्षणी आपल्या मनामध्ये अनेक इच्छा ,आकांक्षा, महत्वकांक्षा जन्म घेत असतात त्या पुर्ण करण्यासाठी आपण पुर्ण ताकदीने यथा अवकाश प्रयत्न देखिल करत असतो.**

परंतु हे प्रयत्न करत असताना आपण जर दुरदृष्टी ठेवून प्रयत्न केले तर परिणाम अगदी सुयोग्य येतात आणि आपण जर दुरदृष्टी न ठेवता प्रयत्न केले तर मग मात्र आपल्याला अन अपेक्षित परिणामांना सामोरे जावे लागते. एकंदरीत आपल्या इच्छा,आकांक्षा, महत्त्वाकांक्षा पुर्ण होताना येणारे परिणाम हे त्या त्या वेळी आपण ठेवलेल्या दुरदृष्टी वरच अवलंबून असतात.दैनंदिन जीवन जगत असताना अनेकदा आपल्याला अनेक चांगल्या,वाईट,अपेक्षित अनपेक्षित घटनाक्रमांना तसेच परिणामांना समोरे जावं लगात.आणि यावेळी आपली दुरदृष्टी कशी आहे. त्यावर अनुभुती ला येणारे परिणाम हे तात्कालीन परिस्थितीमध्ये घेतलेल्या निर्णयावर अवलंबून असतात.दुरदृष्टी हि जीवनातील खुप महत्वपूर्ण बाब आहे.दैनंदिन जीवन हे अंखडित संकटांची मालिका असते.नविन दिवस उगवला कि नविन संकटं,समस्या, नविन आव्हान,नियमित चालू असते.या पृथ्वीवर असा कुणाही व्यक्ती नाही कि ज्याच्या जीवनामध्ये दैनंदिन समस्या,संकटं अडचणी आव्हान नाहीत. मात्र त्याच गांभीर्य हे कमी जास्त प्रमाणात असु शकत. संकटं,वादळ,अडचणी,ह्या येणारच मग आपण गरीब असो कि श्रीमंत,ज्ञानी असो वा अज्ञानी असो सर्वसाधारण व्यक्ती असो किंवा महान व्यक्तिमत्त्व असो आपण ज्या प्रवर्गात मोडतो त्यानुसारच आपल्या आव्हानांच स्वरूप असतं.तसेच आपल्या जीवनातील समस्या ,अडचण वादळ, आव्हान हे व्यक्तिगत असो किंवा सार्वजानिक असो त्याच प्रमाणे आपण आपल्या जीवनातील वयोमानानुसार वेगवेगळे टप्पे जेव्हा पुर्ण करत असतो .तेव्हा मात्र त्या त्या टप्यावर वळणावर आपल्याला येणारे जे अडथळे आहेत ते अडथळे आल्यानंतर आपल्या कडे असणारी दूरदृष्टी हि त्या अडथळयाचे परिणाम बदलते . आपण वेगवेगळ्या क्षेत्रातील करिअरमध्ये जसं सांस्कृतिक ,कला, क्रीडा, उद्योग, व्यवसाय नोकरी ,रोजगार ,स्वयंरोजगार, समाजकारण-राजकारण , आध्यत्मिक तसेच इतर कुठल्याही सेवा क्षेत्रा मध्ये कार्य करत असताना. त्या मध्ये अडथळ्यांची शर्यत हि पार करतच पुढे जावं लागतं.क्षणा क्षणाला टप्या टप्यावर आव्हान हि येणारच अडथळ्यांची शर्यत पार पाडतच प्रवास करायचा असतो नोहे तो करावाच लागतो.आणि यावेळी ब्रह्म अस्त्र म्हणून कामी येते ती आपली दुरदृष्टी ती आपल्या कडे असेल तर आपण कुठलेही अडथळे सहजपणे पार करू शकतो आणि दुरदृष्टी नसेल तर मग मात्र आपण अडथळे पार करू शकणार नाहीत.बिना अडथळयाच पुढे जाणारे लोक अपवादात्मक असतात.खुप कामी लोकांना बिना अडथळयाच पुढे जाता येत. किंवा त्यांच्या जीवनात कुठलिही समस्या अडचण, वादळ नसतं.असे अगदी नाममात्र लोक आहेत.परंतु बहुतांश लोकांना जीवनातील अडथळ्यांची शर्यत पार करत असतानाच वेळोवेळी वेगवेगळ्या टप्प्यावर विविध संकटांना समस्यांना सामोरे जावाच लागते .म्हणून सामोरे जात असताना आपण दुरदृष्टी दाखवू शकलो तर आपल्या जीवनामध्ये भविष्यात त्याचे अति उत्कृष्ट किंवा सर्वोत्तम परिणाम मिळणारच म्हणून तात्कालीन परिस्थितीमध्ये दूरदृष्टी ठेवताना जरी त्रास वाटत असला .तरीही दूरदृष्टीचे परिणाम अत्यंत सुयोग्य असतात .म्हणून दूरदृष्टी ही आपल्या जीवनातील चांगल्या वाईट परिणामांची जणणी असते.म्हणून दुरदृष्टी ठेवा आणि आपल्या जीवनातील सुयोग्य चांगल्या परिणामांचा आस्वाद घ्या.दूर दृष्टी हा जीवनातील प्रभावी आणि यशस्वी रणनिती चा भाग असतो हि रणनिती समजण्यासाठी अथवा अंगवळणी पडण्यासाठी देखिल वैचारिक समज उमज प्रगल्भ असली पाहिजे हि प्रगल्भता ज्ञान उंची ने अर्जित होते .जीवन हितार्थ दूरदृष्टी निर्माण करेल असं ज्ञान अर्जित केलं पाहिजे. आध्यत्मिक ज्ञान पातळी वाढली कि हे ज्ञान आपोआप अर्जित होत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अवकाळी पाऊस व मुकणे धरणातून सोडलेल्या आवर्तनामुळे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यामध्ये दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणामध्ये पाऊस झाला असून पावसामुळे शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास देखील आता हिरावला गेला आहे. तळेगाव येथील अनेक शेतकऱ्यांचा भात शेतीचे लाखो रुपयांचा नुकसान झाले असून यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. तर विमा कंपनीने दिलेले टोल फ्री नंबर अवैध लागत असल्यामुळे नुकसान झालेले भात शेतीचे फोटो आणि माहिती द्यायची कुणाला असा प्रश्न शेतकरी विचारू लागले आहेत. तसेच तालुक्यातील कुऱ्हेगाव येथील शेतकऱ्यांना पूर्व कल्पना न देताच मुकणे धरणाचे आवर्तन सोडल्याने शेतकऱ्यांनी शेतात कापणी करून ठेवलेल्या भाताची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याने शेतकरी संकटात आले आहेत. रविवारी २६ तारखेला



अवकाळी पाऊस व मुकणे धरणाच्या आवर्तनाचा फटका शेतकऱ्यांना बसल्याने ते हवालदिल झाले आहेत. काल सकाळपासुन मुकणे धरणाचे आवर्तन सोडले होते. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास जलद गतीने आवर्तन असल्याने नदी काठावरील लगतच्या

> बेमोसमी पाऊस व त्याबरोबरच मुकणे धरणाचे आवर्तन यामुळे भात, बागाईत अशी पिकांची अतोनात नुकसान झाली आहे. अधिकाऱ्यांनी कागदी घोडे न नाचवता नुकसान भरपाई द्यावी अशी अपेक्षा आहे. **आप्पा धोंगडे, नुकसानग्रस्त शेतकरी**

शेतकऱ्यांनी  कापणी करून ठेवलेले भात, बागाईत पिकाचे नुकसान झाले. नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी विष्णू धोंगडे, मधुकर धोंगडे, शिवाजी धोंगडे, रोहिदास धोंगडे, आप्पा धोंगडे, छबू गडकरी, अलका धोंगडे आदींनी केली आहे. शेतकऱ्यांनी नुकसान झाल्यानंतर पीकविमा कंपनीचा टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधला मात्र त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. वादळ व पावसामुळे काही परिसरातील वीज कालपासून गायब आहे. या संदर्भात प्रशासन व अधिकारी यांनी लक्ष द्यावे ही विनंती शेतकरी वर्ग करीत आहे.

# आदिवासी सेवक राज्यस्तरीय पुरस्कारासाठी भगवान कोकाटे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या सर्वांगी विकासासाठी उल्लेखनीय कार्य



करणाऱ्या व्यक्तीला व सामाजिक संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या कार्याला गौरव करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत व्यक्ती व संस्थांना आदिवासी सेवक पुरस्कार व आदिवासी सेवा संस्था पुरस्कार हा राज्य पुरस्कार दरवर्षी प्रधान करून त्यांचा गौरव करण्यात येतो पण कोरोना परिस्थिती मुळे काही वर्ष हे पुरस्कार दिले गेले नाही तर सन. २०१९-२० ते २०२२-२३ या चार वर्षांतील पुरस्कारासाठी ६० व्यक्तीची आदिवासी सेवक पुरस्कार तर सन.२०२१-२२व २०२२-२३ या वर्षासाठी ८ संस्थाची निवड झाली. एकात्मिक आदिवासी प्रकल्प अकोलासाठी आदिवासी गाव टिटवी येथे आदिवासी नेते समाजासाठी सतत तत्पर असणारे आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बिरसा क्रांती दलाची जिल्हाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक भगवानराव कोकाटे यांची आदिवासी सेवक राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार दिनांक 29/11/23 रोजी मुंबई येथे देऊन त्याचा गौरव करण्यात येणार आहे.

# चंद्रपूरला प्रथमच मिळाला राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाचा मान

## 27 ते 30 डिसेंबरदरम्यान होणार स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2036 मधे ऑलिंपिक स्पर्धांच्या आयोजनाचा मानस व्यक्त केला असून त्या अनुषंगाने यावर्षी होणाऱ्या राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धा ( 19 वर्षाखालील मुले व मुली ) यावर्षी चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा तालुक्यातील विसापूर येथील स्टेडियम वर करण्यात येणार आहे. 26 ते 31 डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत 28 राज्य व 8 केंद्र शासित प्रदेशातील तब्बल 3000 खेळाडूंचा या स्पर्धेत सहभाग राहणार असून 200 संघ व्यवस्थापक , 500 स्पोर्टिंग स्टॉफ आणि 500 च्या जवळपास पालकवर्ग असा मोठा वर्ग या स्पर्धेदरम्यान चंद्रपूर येथे या स्पर्धेदरम्यान राहणार आहे. 27 डिसेंबर रोजी या राष्ट्रीय शालेय स्पर्धांच भव्य आयोजन बल्लारशा तालुक्यातील विसापूर स्टेडियमवर होणार असून या स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, वन सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार क्रिडा मंत्री संजय बनसोडे यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत 20 स्पर्धांचा समावेश असून 2036 मधे भारतात होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धांच लक्ष डोळ्यासमोर ठेवून खेळ



> या भव्य आयोजनाची वातावरण निर्मीती व्हावी म्हणून स्कूटर रॅली , पथनाट्य याचेही ठिकठिकाणी आयोजन करण्यात येणार आहे .
>
> या स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व खेळाडू , संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक, व पालक यांना मोफत ताडोबा सफारी करण्यात येणार असून त्याची संपूर्ण व्यवस्था वन विभागाद्वारे करण्यात येणार आहे .
>
> महाराष्ट्रातील पहिले मिशन ऑलिंपिकची सुरुवात ही चंद्रपूरमधून येणार असून येथून देशभरात जाणारे खेळाडू हे चंद्रपूर, ताडोबासह महाराष्ट्राची ओळख घेऊन जातील, अशी अपेक्षा सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे .

संस्कृतीचं वातावरण या देशात निर्माण व्हावं यादृष्टिकोनातून ही सर्व तयारी सुरु असल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज स्थानिक नियोजन  भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रीय शालेय स्पर्धांच्या आयोजनाचा हा मान चंद्रपूर जिल्ह्याला मिळाला असून चंद्रपूर चा ईतिहास विद्यार्थ्यांना कळावा म्हणून ऐतिहासिक चंद्रपूर,  छत्रपती शिवाजी महाराज , व पर्यटन या विषयावरील क्यु आर कोड द्वारा उपलब्ध होईल असे एक पुस्तक येणाऱ्या सर्व खेळाडूंना देण्यात येणार आहे. सर्व खेळाडूंना व त्यांच्या सोबत येणारे संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक, पालक यांचे निवास , वाहतूक, भोजन अशा विविध व्यवस्था सर्वोत्तम व्हाव्या या दृष्टिकोनातून विविध समित्याही तयार करण्यात आल्या असून चंद्रपूर चे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व समित्या काम करणार आहेत. या स्पर्धा येथिल शालेय विद्यार्थ्यांना पाहता याव्या व त्यांच्यामधे खेळ संस्कृती निर्माण व्हावी , ऑलिंपिक चे वातावरण तयार व्हावे यादृष्टिकोनातून जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेदरम्यान मैदानावर प्रेक्षक गॅलरीत बसण्याची व्यवस्था या दरम्यान करण्यात येणार आहे

# संविधानच भारताचा धर्मग्रंथ : प्रा.डॉ. गोपाल बछिरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** भारतातील वंचित दुर्लक्षित बहुजन अल्पसंख्यांक यांना समानतेची शिक्षा देऊन समता बंधुत्व एकता व अखंडतेमध्ये बांधून ठेवणारा एकमेव ग्रंथ आहे व तो म्हणजे भारतीय संविधान म्हणून संविधानच भारताचा धर्मग्रंथ असे विधान आपल्या व्याख्यानात प्रा.डॉ. गोपाल बछिरे यांनी मोताळा येथे संविधान दिनानिमित्त महारॅलीच्या मेळाव्यात केले. आयोजन प्रशांत वाघोते यांनी केले होते. संविधान जनजागरण महारॅलीला आठवडी बाजारातून सुरुवात केली व बस स्टँड चौकात रॅलीच्या समारोपाच्या ठिकाणी मेळावा घेण्यात आला संविधानाची उद्देशिका वाचून व 26/11 च्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.एस. वाले यांनी केले. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत,काँग्रेस कमिटीच्या चिटणीस जयश्री शेळके यांच्यासह बऱ्याच मान्यवरांचे भाषणे झाली प्रामुख्याने प्रा. नरेंद्र खेडेकर, जालिंदर बुधवंत, जयश्री शेळके, प्रशांत वाघोते, डॉ. गोपाल बछिरे यांच्या भाषणांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला हा कार्यक्रम अहिरे पी.एस. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या सूत्रसंचालन नवनीत शिरसाठ यांनी केले तर आभार आरसी भटकर यांनी मानले.




महाराष्ट्र Business Katta












# समता प्रस्थापित व्हावी हाच संविधान निर्मात्याचा उद्देश



भीमराव सरवदे
संपर्क क्र. 9405466441

आधुनिक केसरी

**विद्यमान पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष बिबेक देबरॉय यांनी नुकतीच संविधान बदलण्यासंदर्भातील गरळ ओकलेली असून गेल्या ७० वर्षांपासून संघ आणि भाजपचे नेते जे सांगत आहेत, तेच त्यांनी सांगितले आहे. देबरॉय यांनी आपली राज्यघटना हा वसाहतवादी वारसा असल्याचे म्हटले असून राज्यघटनेच्या उद्देशिकेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता या शब्दांना आता काय अर्थ आहे, असा प्रश्न विचारला पाहिजे असे म्हटले आहे, तसेच आपल्याला आता नवे संविधान आणावे लागेल असा आग्रहही धरला आहे. वास्तविकतः आपल्यासारख्या विशाल व वैविध्यपूर्ण संस्कृती असलेल्या देशाच्या गरजा, विचार, श्रद्धा, हक्क यांची पूर्तता करणे हे सोपे काम नव्हते! बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान घटनातज्ज्ञ होते.**

राज्यघटनेतील तरतुदी तयार करताना त्यांनी वैयक्तिक आवडीनिवडींना वाव न देता त्यांनी भारतास महासत्ता घडवण्यासाठी राष्ट्रीय हितांना सर्वाधिक महत्त्व दिले. भारतीय राज्यघटना ही जगातील सार्वभौम देशांच्या राज्यघटनेपेक्षा सर्वाधिक विस्तृतपणे लिहिलेली राज्यघटना आहे. पंडित जवाहरलाल नेहरू एकदा म्हणाले होते, भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. आंबेडकरांचा महत्त्वाचा वाटा आहे. संविधान निर्मितीसाठी डॉ. आंबेडकरांएवढे कष्ट आणि काळजी कोणीही घेतली नाही. त्यांनी स्वतंत्र भारताच्या इतिहासात अद्वितीय व अमीट असे आपले स्थान कोरलेले असून भारतीयांस त्यांचा अभिमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान प्रत्येक भारतीयांच्या हृदयात कायम राहील." भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या मसुदा समितीला सामाजिकता व आदर्शवादी दृष्टीने मार्गदर्शन करण्यात मध्यवर्ती भूमिका बजावली होती. भारतीय संविधानात जनतेच्या कल्याणासाठी अनेक मूलभूत समस्यांवर उपाय सुचविण्यात आलेले असल्याने हा एक सामाजिक दस्तऐवज आहे असे ठामपणे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाच्या या मसुद्यात धार्मिक स्वातंत्र्य, अस्पृश्यता निर्मूलन आणि सर्व प्रकारच्या भेदभावावर बंदी यासह नागरिकांच्या विविध नागरी स्वातंत्र्यांसाठी घटनात्मक आश्वासने आणि सुरक्षा देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या व्यापक आर्थिक आणि सामाजिक हक्कांसाठी अधिक कष्ट घेतलेले असून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या सदस्यांसाठी भारतीय नागरी सेवा, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तसेच नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद आणण्यासाठी संविधान सभेचा पाठिंबा ही मिळवला. आरक्षणाच्या माध्यमातून सामाजिक-आर्थिक विषमतेतून सुटका व्हावी आणि भारतातील वंचित वर्गाला प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, अशी संविधान निर्मात्यांची इच्छा होती. समाजपरिवर्तनासाठी अहिंसक क्रांती हवी असते,त्याच क्रांतीचा ध्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होता. केवळ भारतासाठीच नव्हे, तर जगातील तमाम वंचित वर्गाला न्याय मिळावा यासाठी व मानवतेसाठी त्यांनी लढा दिला. बाबासाहेब हे बुद्धिजीवी, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत आणि मानवतावादाचे पुरस्कर्ते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरुवातीच्या काळात भारताची उभारणी करणाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी लढा दिला आणि मग आपल्या स्वप्नातील भारत घडवण्याचा प्रयत्न केला. या महापुरुषाचे स्मरण करण्यासाठी आंबेडकरजयंती जगभरात लोक मोठ्या उत्साहाने साजरी करतात. जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आणि विकासाच्या पटलावर अग्रभागी राहण्यासाठी आज भारताला त्यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांची गरज आहे. त्यांनी आपल्याला दिलेली राज्यघटना हे भारतीय इतिहासातील सर्वात मोठे कार्य आहे. स्वातंत्र्य चळवळीतील आकांक्षा आणि विचारांचा लेखी दस्तऐवज म्हणून तो समग्र मानवजातींसाठी दीपस्तंभासारखा उभा आहे. भारतीय तसेच परदेशी असंख्य लेखकांनी भारतीय जनतेच्या आर्थिक विकास आणि मुक्तीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे वर्णन वेगवेगळ्या प्रकारे केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाने बाबासाहेबांना पहिले कायदामंत्री म्हणून देशसेवेसाठी आमंत्रित केले. नंतर त्यांची घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणूनही नियुक्ती करण्यात आली, त्यांच्यावर संविधानसभेने भारताचे नवे संविधान लिहिण्याची जबाबदारी सोपविली. या कार्यात बाबासाहेबांनी बौद्ध धम्मातील संघपद्धतीचा केलेला अभ्यास आणि बौद्ध धर्मग्रंथांतील व्यापक वाचन त्यांच्या कामी आले. संघ पद्धतीत मतपत्रिकेद्वारे मतदान, वादविवाद व अग्रक्रमाचे नियम आणि कामकाज करण्यासाठी अजेंडा, समित्या आणि प्रस्तावांचा वापर यांचा समावेश होता. बाबासाहेबांनी आपल्या राज्यघटनेला आकार देण्यासाठी पाश्चिमात्य मॉडेल्सचा वापर केला असला, तरी त्याचा आत्मा भारतीय होता. भारताचे माजी राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांनी डॉ. बी. आर. आंबेडकर- द मॅन अँड हिज मेसेज या पुस्तकाला पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे की, मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकरांनी नव्या राज्यव्यवस्थेच्या प्रत्येक गरजेचा अंदाज बांधला होता. इतर राष्ट्रांची उदाहरणे आणि अनुभव आणि आपल्याच समाजाच्या विशिष्ट गरजा यांचा आधार घेत त्यांनी उभी केलेली भव्य वास्तू म्हणजेच भारतीय राज्यघटनेतील नागरिकांचे मूलभूत हक्क होय. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य, न्याय, समता आणि बंधुता सुनिश्चित करणारी राज्यघटनेची प्रेरणादायी उद्देशिका बाबासाहेबांनी संविधानाला दिली. समतावादी समाजव्यवस्थेची निर्मिती हे स्वप्न मात्र आजतागायत अपूर्ण राहिलेले आहे. बाबासाहेब हे केवळ विद्वान आणि प्रख्यात कायदेतज्ज्ञच नव्हते, तर अस्पृश्यता आणि जातीपातीच्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध लढणारे क्रांतिकारकही होते.

आयुष्यभर त्यांनी दलित आणि इतर सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीयांचे हक्क जपताना सामाजिक विषमतेविरुद्ध लढा दिला. ते केवळ महान राष्ट्रीय नेतेच नव्हते तर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रतिष्ठित विद्वानही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजबूत केंद्र आणि स्वतंत्र राज्यांच्या तत्त्वांवर आधारित केंद्र आणि राज्यांच्या संघराज्यीय रचनेचे प्रखर पुरस्कर्ते होते. बाबासाहेबांनी राष्ट्रीय एकता आणि अखंडता बळकट करण्याच्या दृष्टीने एकात्मिक न्यायव्यवस्था आणि सामायिक अखिल भारतीय सेवांची स्थापना प्रस्तावित करून देशाची मोठी सेवा केली. बाबासाहेब एकदा म्हणाले होते की, आमची लढाई स्वातंत्र्याची लढाई आहे, आमची लढाई केवळ आर्थिक फायद्याची आणि



राजकीय सत्तेची नाही, आमची लढाई मानवी प्रतिष्ठेच्या पुनरुज्जीवनाची लढाई आहे, जी हिंदू समाजव्यवस्थेने मोडीत काढली आहे. शेवटी आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, सुपर पॉवर इंडिया बनवताना अस्पृश्यता निर्मूलन आणि भारताला धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था बनविण्याचे श्रेय संविधानात या गोष्टींची तरतूद करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जाते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली. संविधान सुपूर्द करतांना बाबासाहेब म्हणाले होते, संविधान कार्यक्षम आहे, ते लवचिक आहे आणि शांततेच्या काळात आणि युद्धाच्या वेळी देशाला एकत्र ठेवण्यासाठी ते पुरेसे मजबूत आहे, असे मला वाटते. नव्या राज्यघटनेनुसार जर काही चुकीचे झाले तर त्याचे कारण आपल्याकडे वाईट संविधान आहे असे होणार नाही. आपल्याला असे म्हणावे लागेल की, संविधान राबवणारे नालायक आहेत. राज्यघटनेत केवळ लोकशाही शासनपद्धतीचा अवलंब करणे पुरेसे ठरणार नाही, हे बाबासाहेबांना ठाऊक होते. समाजात समता, कायदा व प्रशासनासमोर समानता, घटनात्मक नैतिकता आणि लोकविवेकाचा विकास या भारतातील लोकशाहीच्या यशाच्या अटी आहेत. बाबासाहेबांच्या मते लोकशाहीची सर्वात महत्त्वाची अट म्हणजे समाजात समता प्रस्थापित झाली पाहिजे कारण स्वातंत्र्य आणि बंधुता या संकल्पना विकसित होण्याच्या प्रक्रियेत समता हा पाया आहे. समता ही मूळ संकल्पना असून मानवी व्यक्तिमत्त्वाचा आदर हे त्याचे प्रतिबिंब आहे. समता नाकारली तर बाकी सर्व काही नाकारले जाऊ शकते. असे असले तरी आम्हा भारतीयांचे दुर्दैव असे आहे की, जगविख्यात असलेले आपले संविधान बदलण्याची वल्गना सातत्याने केली जात आहे. भारतीय संविधानाला विरोध करणे आणि सत्तेत आल्यावर ते हटविणे हा विषय १९४९ पासूनच संघाच्या अजेंड्यावर आहे. भारतीय राज्यघटनेविरोधातील आरएसएस-नेत्यांची जाहीर वक्तव्ये त्या वेळच्या वर्तमानपत्रांत अनेकदा छापून आलेली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझरच्या ३० नोव्हेंबर १९४९ च्या अंकात प्रकाशित झालेल्या राज्यघटनेच्या विरोधातील अग्रलेखात म्हटले होते की, भारताच्या नव्या राज्यघटनेची सर्वात धक्कादायक बाब म्हणजे त्यात भारतीय म्हणता येईल असे काहीही नाही. त्यात भारतीय कायदे नाहीत, भारतीय संस्था नाहीत, पारिभाषिक संज्ञा नाहीत. प्राचीन भारतातील मनूच्या नियमांचा त्यात उल्लेख नाही; परंतु आपल्या घटनात्मक पंडितांना (आंबेडकर आणि नेहरू) त्याचे काहीच देणेघेणे नाही. यावरून हे स्पष्ट होते की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मुख्य चिंता मनुस्मृतीच्या पुनर्वसनाचीआहे. केवळ १९५० नंतरच्या दशकांतच नव्हे, तर अलीकडील काळातही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप नेत्यांनी भारतीय राज्यघटनेच्या समर्थनार्थ एकही शब्द काढलेला नाही. या उलट त्यांनी प्रत्येक प्रसंगी विरोधच केलेला दिसून येतो. जेव्हा १९९० च्या दशकात मंदिराचा उन्माद मोठ्या प्रमाणात वाढला होता आणि बाबरी मशीद पाडण्यात आली होती, तेव्हा २९ जानेवारी १९९३ रोजी भाजपचे ओबीसी नेते कल्याण सिंह यांनी फैजाबादमध्ये म्हटले होते की मी आज या ठिकाणी घोषणा करतो की मला बाबरी पाडल्याबद्दल अजिबात खेद वाटत नाही. आम्ही केंद्रात सत्तेवर आलो तर राज्यघटनाही बदलू. पुढे जेव्हा १९९८ साली भाजप पहिल्यांदा सत्तेवर आली तेव्हा पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी सर्वप्रथम भारतीय राज्यघटना बदलण्यासाठी संविधान समीक्षा समिती स्थापन केली होती. तसेच आरएसएसने अरुण शौरीसारख्या आपल्या लोकांना संविधानाच्या विरोधात प्रचारासाठी गुंतवले होते. या समितीचे अध्यक्ष व्यंकट चलैया होते, ज्यांचा हिंदू आग्रह सर्वश्रुत होता. मात्र, या समितीने काय समीक्षा केली आणि काय अहवाल दिला, हे समजू शकले नाही. कदाचित सरकारने वेळकाळ अनुकूल नसल्याचे समजून ते थांबवले असावे! विशेष म्हणजे या समितीची स्थापना होताच जिथे आरएसएसने आपले सर्व लेखक, पत्रकार, विश्लेषक आणि साधू-महात्मांना संविधानाला विरोध करण्यासाठी गुंतवले होते, तिथे भाजपने स्वतःच्या नेत्यांना मैदानात उतरवले. राज्यघटना-पुनरावलोकनाच्या मुद्द्यावर अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार यशस्वी झाले नाही, त्याची दोन कारणे होती; पहिली गोष्ट म्हणजे त्या काळी संपूर्ण प्रसारमाध्यमे आणि यंत्रणा आजच्याप्रमाणे सरकारच्या नियंत्रणाखाली नव्हती आणि सरकार फॅसिझमच्या दिशेने वाटचाल करत असले तरी पूर्णपणे फॅसिस्ट नव्हते. आजची परिस्थिती मात्र पूर्णपणे वेगळी आहे. आज सत्ताधीशांनी भारताच्या मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि यंत्रणांवर नियंत्रण ठेवलेले असून आरएसएसचा आयटी सेल सरकारच्या बाजूने ठामपणे सक्रिय भूमिकेत आहे. विरोधकांना पूर्णपणे चिरडून टाकण्याचे काम आज फॅसिस्ट पद्धतीने सत्ता करत आहे आणि सगळ्यात मोठा बदल म्हणजे मागास जातींचे हिंदूकरण झाले आहे, जे सरकारच्या विरोधात जाण्याच्या स्थितीत नाहीत. त्यामुळे आज संविधानविरोधाचा मुद्दा कायम जवलंत करून ठेवलेला आहे. आज संघ आणि भाजप या दोघांनाही असे वाटते कि काळ आपल्या बाजूने आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष बिबेक देबरॉय यांनी नुकताच एका वर्तमानपत्रात भारतीय संविधान बदलण्यासंदर्भात एक लेख लिहून चिंता व्यक्त केली आहे. ही चिंता केवळ बिबेक देबरॉय यांची नाही, तर आरएसएस आणि भाजपची आहे. समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता ही तत्त्वे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपला सलणारी आहेत, कारण त्यांच्या मते भारतीयत्व म्हणजेच हिंदुत्व या तत्त्वांमध्ये नाही. त्यांचे म्हणणे बरोबर आहे, कारण भारतात मुस्लीम राजवटीपूर्वी राजेशाही होती, जी धर्माची राज्ये होती त्यात समाजवाद नव्हता, समता नव्हती, लोकशाही नव्हती आणि न्यायही नव्हता. सामाजिक समता संपुष्टात आणून जाती-विभाजनावर आधारित सामाजिक समरसतेचे तत्त्व अंमलात आणण्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उद्दिष्ट आहे. आपल्या सध्याच्या राज्यघटनेने आपल्याला आपले मूलभूत हक्क मिळविण्यासाठी आणि सामाजिक-आर्थिक दडपशाहीविरुद्ध लढण्यासाठी जी कायदेशीर शक्ती दिली आहे ती आरएसएसची सामाजिक समरसता लागू होताच संपुष्टात येईल. त्यामुळे देबरॉय यांच्या लेखाकडे मी संविधान बदलण्यासाठी जातीय बहुमताचे वातावरण निर्माण करण्याचे षडयंत्र म्हणून पाहत आहे.

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू- आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# महात्मा जोतीराव फुले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५


आधुनिक केसरी

**भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले.**

खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षांतच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून **देताना म्हटले आहे की**

**विद्येविना मती गेली ।**
**मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली ।**
**गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली



शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# महान समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले



बबन दामोदर गुळवे
संपर्क क्र.९५४५४४२६४८.

आधुनिक केसरी

**एकोणिसाव्या शतकात एकीकडे संपूर्ण भारतावर इंग्रजांच्या जुलमी राजवटीचा अंमल सुरू होता तर दुसरीकडे स्वतःला उच्च वर्णीय समजणारे लोक भारतातील कनिष्ठ वर्णीयांचा अतोनात असा शारीरिक व मानसिक छळ करत होते.उच्च वर्णातील लोकांनी समाजाची सगळी सूत्रे आपल्या ताब्यात घेतले होते. बाकीच्या तीन वर्णातील लोकांवर हुकूमत गाजवताना या लोकांनी धर्माची सगळी कार्ये व शिक्षण शिकण्याचा अधिकार स्वतःकडे ठेवले होते.**

भारतात कमालीची सामाजिक विषमता होती.चतुर्थ वर्णातील शुद्र लोकांना माणूस म्हणून जगण्याचा कसलाही अधिकार नव्हता. अशा या अमानवी अराजकतेच्या काळात महाराष्ट्रात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म झाला.

११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे ज्योतिबा फुले जन्माला आले आणि महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीचे वारे वाहू लागले.ज्योतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव फुले व आईचे नाव चिमणाबाई फुले होते.अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असूनही त्यांनी पुणे येथे वडिलांना त्यांच्या व्यवसायात मदत करत माध्यमिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.थॉमस पेन या विचारवंतांचा ज्योतिबा फुले यांच्यावर प्रभाव होता.भारतात स्त्रियांना व मागासवर्गीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.नेमकी ही गंभीर बाब लक्षात घेऊन ज्योतिबा फुले यांनी भारतात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पुढाकार घेतला. सर्वप्रथम त्यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले.मग १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात



त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.सावित्रीबाई फुले यांना शिक्षिकेचे प्रशिक्षण देऊन भारतातील पहिली शिक्षिका व पहिली मुख्याध्यापिका बनविले.१९५२ साली त्यांनी मागासवर्गीय मुलांसाठी पुण्यात शाळा सुरु केली तसेच आपल्या घरासमोरील पाण्याचा हौद सार्वजनिक केला.महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे सामाजपरिवर्तनाचे हे कार्य पाहून उच्च वर्णियांच्या पोटात पोटशूळ उठले.त्यांनी गोविंदरावांचे कान भरले,'तुमचा दिवटा ज्योतिबा धर्म बाटवायला निघालाय त्याला वेळीच आवर घाला नाहीतर धर्माचा सत्यानाश होईल.' यामुळे गोविंदराव व ज्योतिबा फुले यांचा वाद झाला आणि गोविंदरावांनी ज्योतिबा व सावित्रीमाईंना घरातून बाहेर काढले.इथे समाज कंटकांचा विजय झाला खरा पण हा विजय फार काळ टिकला नाही.पुण्यातील गंजपेठ येथील उस्मान शेख यांनी ज्योतिबा व सावित्रीमाईंना आश्रय दिला.  कितीही संकटे आली तरी न डगमगता ज्योतिबा फुले व सावित्रीमाईंनी आपले समाजकार्य चालूच ठेवले.याकामी वस्ताद लहूजी साळवे व इतरांचे सहकार्य लाभले.सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी भारतातील स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या अनेक कुप्रथा बंद केल्या. विधवांचे केशवपन बंद केले व विधवा स्त्रियांचे विवाह घडवून आणले. शेतकऱ्यांसाठी अनेक लढे उभारले.१८८२ साली हंटर कमिशनपुढे निवेदन देऊन भारतातील मुलांमुलींसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याची मागणी केली.किती ही त्यांची व्यापक दूरदृष्टी! त्यांच्या या क्रांतिकारी कार्यामुळे ते खरोखर महात्मा म्हणून शोभतात.केवळ आणि केवळ महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या उभयतांनी भारतात शैक्षणिक क्रांतीद्वारे समाजसुधारणेचे एक नवीन पर्व सुरू केले.नेमका हाच धागा पकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपला गुरू मानले होते.२८ नोव्हेंबर १९९० रोजी युगप्रवर्तक महात्मा ज्योतिबा फुले यांचे निधन झाले.अवघा भारत सामाजिक क्रांतीसुर्याला,एका महामानवाला, एका थोर विचारवंताला गमावून बसला.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाजकार्यासाठी त्यांना कोटी कोटी वंदन! त्यांच्या पुण्यस्मरणाच्या दिनी त्यांच्या क्रांतिकारी स्मृतींना विनम्र अभिवादन.

# गुटखा बंदी कागदावरच आहे काय ?



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**वर्तमानपत्र उघडल्यानंतर जशा आत्महत्येच्या बलात्काराच्या बातम्या येतात त्याचबरोबर आता गुटखा पकडल्याच्या किंवा धाड  घालून गुटखा हस्तगत केल्याच्या बातम्या फार मोठ्या प्रमाणात वाचायला मिळतात. खूप मोठ्या रकमांचा गुटख्याचा  साठा जप्त केला जातो. जप्त केल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली जाते असेही वाचतो. परंतु ती कारवाई काय असते ते समजत नाही. केवळ दंड करून सोडून दिल्यानंतर परत ते सत्र सुरू असते. आता हेच बघा,नाशिक शहरात दोन लाखाचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला.**

घोटी शिवारात 63 लाख 24 हजार गुटखा जप्त केला. नाशिक येथील वडाळा गावातून साडेचार लाखाचा गुटखा जप्त केला. धुळ्याजवळ 28 लाखाचा गुटखा जप्त केला. डोंबिवलीत 99 हजार गुटखा जप्त, वसई महामार्गावर 1 कोटीचा गुटखा जप्त, अकोला जिल्ह्यात गुटख्याची अवैध साठवणूक, तेलारा, मलकापूरला 19 लाखाचा गुटखा जप्त. मध्यप्रदेश मधून बुलढाण्यात गुटख्याचा पुरवठा, साताराकडून पुण्याकडे निघालेला सत्तर लाखाचा गुटखा जप्त. अशाच प्रकारे जालना, छ.संभाजीनगर, पुणे, जळगाव, अमरावती, नागपूर,यवतमाळ अशा अनेक ठिकाणी गुटख्याचा साठा जप्त केला गेल्याच्या  बातम्या वाचल्या असतील. दिल्लीहून सडकी सुपारी आणून अमरावती मध्ये गुटखा बनवला जातो अशीही बातमी वाचण्यात आली. अनेक निरनिराळ्या नावाने ब्रँड लावून विक्री होते. कोट्यवधीची उलाढाल होते, त्यात अन्न औषध प्रशासनाचाही हिस्सा म्हणून दिला जातो ही चर्चा आहे.

गावपातळीवर तालुक्याचे ठिकाणी खेडे वस्तीवर सुद्धा गुटखा विक्री सर्रास सुरू असते पण अशा ठिकाणी गुटखा पकडला आहे, कारवाई झाली आहे, असे शक्यतो वाचायला मिळत नाही. फक्त या मोठ्या बातम्या तेवढ्या दिसतात मात्र अशा प्रकारे जो गुटखा विक्री केला जातो त्याचे प्रमाण खूप असते.  शालेय,महविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुणाई यांच्यात ते विभागले असते.

राज्यात गुटख्यावर बंदी असताना अशा प्रकारे अनेक ठिकाणी त्याचा मोठ्या प्रमाणात साठा जप्त केला जातो त्याची विक्री मात्र छुप्या मार्गाने सुरूच असते. काही ठिकाणी तर उघड उघडपणे गुटखा विक्री होत असते. अर्थात अशा प्रकारे पान टपऱ्यावर,किराणा दुकानात, चहाच्या टपरीवर, गुटखा, सुगंधी तंबाखू विक्री होत असल्याने तो सहजगत्या मिळू शकतो.बियरबार,दुधविक्री केंद्र, यातूनही गुटखा विक्री होत असल्याचे समोर आले आहे.त्यांच्या पाठीशी बडी मंडळी असल्याने ते न घाबरता विक्री करत असतात. अन्न औषध प्रशासनाचे किती गंभीर पणे याकडे लक्ष आहे दिसून येते. दुर्लक्ष कले जाते. शाळा कॉलेज परिसरात 100 मीटर पर्यंत(  गुटखा पान तंबाखू सिगरेट आदी  वस्तू विक्री केली जाऊ नये, ) पान टपऱ्या नसाव्या असा आदेश महाराष्ट्र शासनाने काढला असूनही त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. आणि हेच महत्त्वाचे कारण असल्यामुळे शाळा कॉलेज परिसरात तो सहज पणे मिळतो. विद्यार्थी आणि तरुण पिढी या नशेपासून दूर राहण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठीच सरकार धोरण आखते.परंतु नुसते धोरण आखून उपयोग नाही. असे असंख्य धोरणे आणि कायदे केले जातात परंतु कडक अंमलबजावणी अभावी ते सर्व फोल ठरले आहेत.

प्रामुख्याने ही शासनाची जबाबदारी तर आहेच परंतु समाजाने, शिक्षण संस्थांनी, आणि स्वयंसेवी संस्थांनी, याबाबतीत पुढाकार घेणे आवश्यक आहे. परंतु शिक्षण संस्थाचालक याबाबतीत उदासीन असतात.. शाळेजवळ जरी टपरी असली तरी त्याला संस्था मनाई करत नाही. किंवा तक्रार करत नाही एखादा विचारी, मुलांच्या भवितव्याचा विचार करणारा मुख्याध्यापक तक्रार करतो त्याच्यावर हल्ले होतात जीवे मारण्याची सुपारी दिली जाते. नजीकच्या काळातच मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी त्यांनी टपरी हटवण्यासाठी तक्रार केली किंवा पुढाकार घेतला तेव्हा त्यांच्यावर प्राण घातक हल्ला झाला. मुख्यमंत्र्यांकडून त्यांची विचारपूस झाली. वैद्यकीय मदत देऊ केली. या गोष्टीचा विचार केला तर शासन- प्रशासनाने ही गंभीर बाब समजून त्याविषयी ताबडतोब काहीतरी कारवाई आणि कार्यवाही करायला हवी आहे. चांगल्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींवर असे हल्ले होऊ लागले तर मग त्यासाठी झगडूच नाही का? अशा शाळांच्या मुख्याध्यापकांना संरक्षण द्यायला हवे आहे अर्थात ते करतात ते विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच करतात. आपली युवा पिढी, शालेय विद्यार्थी व्यसनाधीन होऊ नये हाच त्यांचा उद्देश असतो.शाळा,महविद्यालयीन




परिसरातील परिस्थितीचा शोध घ्यायला हवा.

कायदे केले जातात परंतु तेही कागदावरच असतात आणि विशेष म्हणजे अशा अमली पदार्थ किंवा गुटखा विक्री याला अनेक राजकीय नेत्यांचेही पाठबळ असते अशाही बातम्या आपण वाचल्या असतील. अनेक ठिकाणी दारूबंदी असतानाही नेतेच दारूबंदी होऊ नये याकरता प्रयत्नशील असतात. एकीकडे आपण म्हणतो की भारत हा तरुणांचा देश आहे एकूण लोकसंख्येपैकी 60/65 टक्के 35-40 वयोगटातील तरुण या देशात आहेत. या तरुणाईच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत आणि अशा प्रकारे गुटखा आणि नशा आणणारे सुगंधीत सुपाऱ्या जर तरुणांच्या हाती लागतील तर त्यांचे मन व्यसनाचे आहारी जायला वेळ लागत नाही. विद्यार्थीदशा ही पहिली पायरी आहे गुटखा ही सुरुवात आहे. ह्याच वेळी ते जर व्यसनाधीन झाले तर पुढे त्याचे प्रमाण वाढत जाते त्या दृष्टीने हा विचार होणे आवश्यक आहे.

निवडणुकीच्या काळात आपण बघितले आहे की कशी दारू विक्री होते.खाणे.. पिणे.गुटखा.. धुम्रपान.. यात युवक वर्ग कसा कसा व्यसनाधी होत जातो त्याच्या आहारी जातात .अनेक युवक व्यसनाधीन होतात. जीवनातून उठतात.व्यसनासाठी गुन्हेगारी कडेही वळतात.

सुपारी आणि तंबाखू यांच्या मिश्रणामध्ये सुवासिक द्रव्य घालून गुटखा बनवला जातो त्यात निकोटीन आणि अनेक घातक रसायने असतात, त्यामुळे पोट, तोंड, जीभ, घसा, अन्ननलीका याचा कर्करोग होऊ शकतो. गुटखा अतिशय अपायकारक असतो त्याच्या सेवनाने अनेकांना मृत्यू ओढवला आहे. त्याच्या सेवनाने  कर्करोग होतो हे सिद्ध झाले आहे. फुफुसाचे आजार, हृदयविकार, सुद्धा यामुळे होतात .लाखो लोकं यामुळे मृत्युमुखी पडतात. कर्करोगाचे बरेचसे प्रकार हे तंबाखूशी निगडीत असल्याचे डॉक्टरी निदान आहे. त्यासाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करते, योजना राबवल्या जातात मोठे मोठे हॉस्पिटल्स उभारले जातात ते योग्यच आहे, परंतु त्याच्या मूळ कारणाकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते, कारण दारू, बियर, गुटखा, या साऱ्या गोष्टीतून सरकारला फार मोठा महसूल मिळतो आणि त्यामुळे हे दुर्लक्ष केले जाते म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. सिगारेट पिणे,दारु पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे टिप मारली की शासन प्रशासनाची जबाबदारी संपली... मग प्या आणि मरा.. मध्यंतरी अशी एक बातमी वाचण्यात आली होती, ती होती दारू आणि बियर चा खप कमी झाल्यामुळे चिंता व्यक्त केली होती, महसूल कमी झाला होता त्यासाठी महाराष्ट्र शासनाने एका अभ्यासगटाची स्थापन केली. अर्थातच दारू पिण्याचे प्रमाण कमी झाले ही चांगलीच गोष्ट आहे .परंतु त्याचे प्रमाण कमी का झाले हा काही संशोधनाचा विषय नाही, आणि त्याच्यावर समिती नेमणे हा ही एक विचित्र प्रकार वाटतो. भलेही व्यसन वाढले तर चालेल परंतु खजिन्यात येणारा महसूल कमी व्हायला नको हीच भावना दिसते.

राजकीय द्वंद्वात आणि आपापसातील मतभेदामुळे राजकारण गढूळ झाले आहे. त्यात जसे  बेरोजगारी, महागाई, आणि त्याचबरोबर आता गुटखा मावा सुगंधी तंबाखू दारू याचे तस्करी कडे लक्ष दिले जात नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.

स्वामी विवेकानंद म्हणायचे युवा शब्दात वायू म्हणजे गती आहे. आणि त्या दृष्टीने या युवाशक्तीला विधायक वळण दिले पाहिजे. समाजाप्रती प्रेम, कणखर राष्ट्र भक्ती, आणि निर्विसनी युवापिढी तयार होणे आणि घडवणे हे सुद्धा शिक्षण संस्थेकडून अपेक्षित आहे. सामाजिक, राजकीय, आणि शैक्षणिक, या तिन्ही पातळीवर युवकांसाठी मोठे प्रयत्न होणे आवश्यक आहे नाहीतर गुटख्याची आणि अशा मादक द्रव्यांची तस्करी सुरू राहून,विद्यार्थी, युवक  कमकुवत होईल. आताच बघितले तर अनेक युवक नैराश्याने ग्रासलेले आहेत त्यांना रोजगार नाही. त्यांची एकंदरीत जीवनाची दिशा बदलून जात आहे. सर्वच युवक व्यसनी आहेत असे नाही, परंतु ही गुटखा,मावा, सुगंधी सुपारी, तंबाखू, ची प्राथमिक अवस्था जी व्यसनाला टोकापर्यंत नेते ती सुरू राहिली तर आपला भारत देश व्यसनाधीनांचा देश म्हणून नक्कीच ओळखला जाईल. तेव्हा आताच देश महासत्ते कडे वाटचाल करीत असतांना सावधानता आवश्यक आहे.गुटखा तस्करी ,आणि विक्री करणाऱ्या वर कडक कारवाई आवश्यक आहे.

# भारतीय संविधान दिनाचे महत्त्व...

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानाचा स्वीकार ज्या दिवशी केला गेला तो दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर. दरवर्षी हा दिवस संविधान दिन म्हणून भारतभर साजरा केला जातो. हा दिवस राष्ट्रीय कायदा दिन म्हणून पण ओळखला जातो. १९४९ रोजी भारतीय संसदेने अधिकृतपणे भारतीय संविधानाचा स्वीकार केला आणि २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान अमलात आणले, म्हणजेच या देशात लागू झाले. १९ नोव्हेंबर २०१५ रोजी केंद्रीय सामाजिक व सशक्तीकरण मंत्रालयाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून भारतभर साजरा करण्याचा निर्णय घेतला.**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २ दोन वर्षे अकरा महिने व सतरा दिवसांत अतिशय अभ्यासांती व कठोर परिश्रम घेऊन भारतीय संविधानाची निर्मिती केली व तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी या देशाला अर्पण केले. आणि २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान अमलात आले आणि भारतीय संविधानानूसार या देशाचा राज्यकारभार सुरू झाला आणि आपला भारत देश जगातील एकमेव प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित झाला. भारतीय संविधान हा देशाचा आत्मा व शान आहे. भारतीय संविधानामूळेच आज आपण सुरक्षित व बिंधास्तपणे जीवन जगत आहोत. आनंदाने व गुण्यागोविंदाने नांदत आहोत. भारतीय संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तमाम जातीधर्माच्या लोकांना घटनेच्या रूपात समान अधिकार बहाल केले आहेत. गरीब असो की श्रीमंत, झोपडीत राहाणारा असो की महालात या सर्वांना एक आणि एकाच मताचा अधिकार दिला आहे. पूर्वी राजा राणीच्या पोटातून जन्माला यायचा आणि आता संविधानामूळे राजा मतपेटीतून जन्माला येत आहे. एवढी किमया भारतीय संविधानाची आहे. आज आपल्या भारताची जी काही प्रगती झाली आहे किंवा होत आहे ती भारतीय संविधानामूळेच. हे कोणालाही नाकारता येणार नाही. आणि हे भारतीय संविधान समता, बंधूता व न्याय या तीन नीती मूल्यांचा स्वीकार करते. महिलांच्या बाबतीत सांगायचे म्हणजे पूर्वी महिलांना चूल आणि मूल इतक्यातच मर्यादित ठेवले जात होते. परंतु आज भारतीय संविधानामूळे महिला राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारत आहेत. ही सारी किमया डॉ बाबासाहेबांची आहे. एवढेच नाही तर आजघडीला प्रत्येक क्षेत्रात महिला मोक्याच्या जागा काबिज करत आहेत. ज्या महिलांना घराचा उंबरठा ओलांडता येत नव्हता, ती महिला आज चंद्रावर पाऊल ठेवत आहे. किरण बेदी पहिली महिला ऑफिसर झाली. दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे महिलांना गरोदर पणात रजा व दिवाळी बोनस हे सुध्दा संविधानामूळेच मिळत आहे. अशा एक ना अनेक सुविधा व लाभ आपल्याला संविधानामूळेच घेता येत आहे. याचे सारे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांना जाते. तसेच सामाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात आरक्षण ही बाबासाहेबांची मोठी देन आहे. परंतु काही बिनडोक लोक म्हणतात की बाबासाहेबांनी आमच्यासाठी काय केलं? जे काही केलं ते त्यांच्या बौद्ध समाजासाठीच केलं. विशेष करून अशा बिनडोक लोकांसाठीच हा लेख प्रपंच लिहीत आहे. बाबासाहेबांनी केवळ आपल्याच समाजासाठी संविधान लिहिले असे म्हणणे साफ चूकीचे आहे. तर तमाम भारतीयांसाठी म्हणजेच अठरा पगड जातींसाठी ते लिहिले आहे. हे आपल्याला माहीत असावे. भारतीय संविधानानूसारच आज देश चालतो आहे. समता, बंधूता व न्याय हा संविधानामूळेच देशात टिकून आहे. नाहीतर देशाचे पार तुकडे तुकडे झाले असते व देश कधीच एकसंघ राहीला नसता.

-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे

# पोलिसांचा अजब कारभार, चोर सोडून ड्रायव्हरला पळवले

## वसुलीत गुंग झालेल्या पोलिसांना "सद्रक्षणाय, खल निग्रहणाय" बोधवाक्याचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील येरमाळा परिसरात सोलापूर धुळे महामार्ग तसेच येरमाळा बार्शी मार्गावर काही महिन्यांपासून चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याने वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. व्यावसायिकामध्येही महामार्गावरून व्यवसायासाठी आवश्यक माल घेउन जाताना प्रवास खूपच डोईजड झालेला आहे.

गेल्या महिन्यापूर्वीच चालत्या वाहना मधून चोरीच्या दोन घटना घडल्या होत्या त्यावेळी या तक्रारदारांना पोलिसांकडे वाहनातील चोरी बाबतची रीतसर तक्रार देण्यास गेल्या नंतर आलेला अनुभव हा खूप लाजिरवाणा होता. त्यातच सोमवारची घटना म्हणजे येरमाळा पोलिसांकडून त्रस्त वाहनधारकासाठी "चोर सोडून, संन्यासाला फाशी" असाच होता.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, हैद्राबाद ते बीडकडे जाणाऱ्या ट्रक क्र.के.ए.५६ १३७७ गाडीतून एश्वर्या एग्रो प्रोसेसर प्रा.लि. कंपनीचा मिनी कोलम तांदळाचे ९६२ कट्टे माल घेऊन जात असताना तेरखेडा येथील लक्ष्मीपारधी पिढी ते बीड रोडवर चालत्या गाडीतून अज्ञात चोरट्यांनी ताडपत्री फाडून ३२ तांदळाचे कट्टे चोरल्याचा प्रकार सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडला. हा घडलेला



प्रकार चालकाला मागून येणाऱ्या वाहधारकांनी सांगितल्यावर लक्षात आला. सदरील प्रकार लक्षात येईपर्यंत गाडी वाशी पोलिस ठाण्याच्या हद्दीत आली होती. त्यानंतर त्या गाडी( ट्रक क्र.के.ए.५६ १३७७ ) वरील ड्रायव्हरला वाशी व येरमाळा पोलिसांकडून मिळालेली वागणूक ही अंगावर शहारे येण्यासारखी होती. चालत्या ट्रकमधून चोरी होत असताना जेव्हा ट्रक वाशी पोलिसांच्या हद्दीत आली त्यावेळी रात्रीच्या गस्तीच्या पोलिसांनी त्या चालकाला मदत तर दूरच चालकाला आमच्या हद्दीत गुन्हा घडला नाही,तू येरमाळा पोलिस ठाण्यात जा असे सांगितले. चालकाने गाडीसह येरमाळा पोलिस ठाणे गाठले असता येरमाळा पोलिसांनी चालकाला गाडीत घालून घटना स्थळ गाठले. तेव्हा हा प्रकार आमच्या हद्दीत नाही तर वाशी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने वाशीला तक्रार द्या असे सांगून येरमाळा येथून गाडी पाठवून पहाटे तीन वाजता वाशीकडे पाठवले. दोन्ही ठाण्याच्या हद्दीच्या वादात मंगळवारी रात्री पर्यंत घटना घडल्या पासून बावीस तासानंतर गुन्हा नोंद केला गेला. रात्री आठ वाजता चालक मोहम्मद नबिसाहब मोहम्मद उस्मानसाहब भंगिवाले रा. होटगी. ता. हुमानाबाद जि. बिदर याच्या फिर्यादी वरुन गाडीतील १३१८ रु. किंमतीचे ३२ कट्टे एकूण ४२१७६ रु. माल अज्ञात चोरट्याने चोरल्याची फिर्यादीवरुन रात्री आठ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरील घटनेनंतर घटना ग्रस्त वाहनधारकांना तात्काळ मदत करायचे सोडून दोन्ही पोलिस प्रशासनाकडून हद्दीच्या वादात मंगळवारी दिवसभर गुन्हा सुद्धा नोंद केला नसल्याने सदरील प्रकारावरुन या दोन्ही पोलिस ठाण्याच्या पोलिसांचे आणि वाटमारी करणारे यांच्या सोबत टक्का ठरला आहे. अश्याच चर्चा सुरु आहेत.

# पतंजली योग परिवारच्या साधकांनी घेतले कुष्ठरुग्ण व मतिमंद मुलांसोबत जेवण

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** आपण समाजातील एक घटक असून, समाजाचे देणं लागतोत ही भावना जोपासत नांदेड पतंजली योग परिवार दरवर्षी विविध उपक्रम राबवत असते. रविवार दिनांक 26 नोव्हेंबर रोजी नेरली कुष्ठधाम नांदेड या निसर्ग रम्य ठिकाणी कुष्ठरुग्ण व मतिमंद मुलांसोबत जेवण तसेच त्यांनी बनवलेले साहित्य खरेदी केले व स्वच्छता अभियान राबवले.

सर्व प्राण्यांमध्ये मनुष्याला विवेक आहे, विचार करण्याची शक्ती आहे. कोणता ही प्राणी जे करू शकत नाही ते मनुष्य सहज करू शकतो. स्वतःसाठी तर सर्व प्राणी जगतात पण समाजातील दुर्बल असलेल्या दीनदुबळ्याला मदत करणे , त्यांना आनंद देणे , त्यांचं दुःख वाटून घेणे हे मनुष्याचे कर्तव्यच आहे. ही भावना जोपासत पतंजली योग परिवार नांदेड नेरली कुष्ठधाम येथील कुष्ठरुग्ण व मतिमंद मुलांसोबत सर्वांनी जेवणाचा आनंद घेतला तसेच स्वच्छता अभियान राबवले. त्यांनी बनवलेले काही साहित्य जसे सतरंजी, दिवाळीचे दिवे, पेपर प्लेट्स, गुलदस्ते आदी खरेदी करून त्यांना आर्थिक मदत - सहकार्य करण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांच्या कलेची ही कदर - सन्मान केला. मुलांना कुष्ठरुग्ण काय व कसे असतात हे दिसले - कळले. मानवतेची सेवा - कर्तव्य म्हणजे काय, हे मुलांना कृतीतून समजले. कुष्ठरुग्णां विषयीची भीती व गैसमज ही दूर झाले. नेरली कुष्ठधाम ला समाजातील इतर मंडळींनी ही सहकुटुंब भेटी द्याव्यात, असे आवाहन अनिल अमृतवार यांनी ह्या प्रसंगी केले. याप्रसंगी सर्वश्री पंढरीनाथ कंठेवाड, शंकर परकंठे, सिताराम सोनटक्के, अनिल कामीनवार, वसंतराव कल्याणकर, लता सूर्यवंशी, अरुणा मामुलवार, अदिती वानखेडे, सपना वानखेडे, मनीषा शिंदे, मीनाक्षी वायपणकर, कोमल वानखेडे, अनिता वानखेडे, शामा मालपाणी, मंगला पाटील, विष्णुदास शिंदे, उत्तमराव वट्टमवार, मलिकार्जुन कामठेकर, रंजना सोनटक्के, चंद्रकांत बोनगुलवार, अनिल कदम, सुनिता डांगे, पार्वती पटफळे, डॉ. सुनिता वैजवाडे, बालाजी शिंदे, पांडुरंग शिंदे, श्लोक वानखेडे, संजय सोनटक्के, प्रा. हनुमंतकर, ज्ञानोबा तेलंग, बालाजी वारले, पंडित पाटील, सतीश कुबडे, सदाशिव पाटील, पांडुरंग शिंदे, मंगाजी महाजन, गजानन सर्जे, व्यंकटराव कल्याणकर, अच्युत वायपनकर, कुमारी योगिता, कुमार गोविंद आदी उपस्थित होते. या प्रसंगी मराठवाडा लोकसेवा मंडळ नेरली नंदनवन तर्फे विश्वस्त मनोहरराव जाधव व कर्मचारी दिपक लोखंडे हे हजर होते.

# दुष्काळात तेरावा; अवकाळीचा फटका

## जोरदार पाऊस, नद्यांना पूर पाणी

आधुनिक केसरी न्यूज




**खुलताबाद :** ऐन हिवाळ्यात अद्याप थंडी सुटली नसली रविवारी संध्याकाळी ढगांची गडगडाट विजेची कडकडाट वादळीवाऱ्यासह तालुक्यात ठिकठिकाणी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली व सर्वत्र पाणीच पाणी केले तर नदी नाल्यांना पुरपाणी आले व रब्बी पिक व पालेभाज्या चे मोठे नुकसान करून दुष्काळात तेरावा महिना म्हण्याची वेळ शेतकऱ्यांवर आणली.तालुक्यात संध्याकाळी अचानक वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली त्यात ढगांची गडगडाट व विजेची कडकडाट सह मुसळधार पावसाला सुरुवात होवून जेकी गत चार महिन्यांच्या पावसाळ्यात इतका जोराचा व इतका वेळ पाउस झाला नव्हता ते रविवारी झाला मुसळधार पावसाने वेचनीला आलेला कापुस, फुलाऱ्यात असलेली तुर, पेरा केलाला हरभरा, गहु, मका, ऊस, हिरवा भाजीपाला गवत आदि जमीनदोस्त करुन सोडले. तर झालेल्या पावसाचे पाणी पत्र्यावर मावत नसल्याने गळीत करत नागरिकांना जागरण करण्यास भाग पाडले.पाऊस इतका जोराने होता की त्यामुळें नागरिकांत भिती निर्माण झाली होती. रस्ते नदी नाले सर्वत्र पाणीच पाणी दिसून येत होते तर गिरीजा मध्यम प्रकल्प येसगाव वरील जी नदी फुलमस्ता ज्याचे उगम म्हैसमाळ आहे.पावसाळ्याच्या चार पूरपाणी आले नाही ती भरुन वाहीली तर बाजार सावंगी येथील धाड नदी तीलाही चार महिन्यांत पूर आले नाही ती ही भरुन वाहिली.आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. दुष्काळात तेरावा महिना म्हण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. मालाला भाव नाही,उत्पन्न नाही, सद्या दुष्काळ जाहीर केलेला आहे.अशात अवकाळीने पिक शेती मालाला जमीनदोस्त केले आहे. शासनाने पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी.पुर्वीचीच नुकसान भरपाई हाती पडली नाही व पुन्हा निसर्गाने फटका दिला आहे.

**बाजारसावंगी -शिरोडी ताजनापूर रस्ता बंद, ये-जासाठी हाल**

या रस्त्यावर तथा नदीवर दोन ठिकाणी पुल काम सुरू असून अचानक आलेल्या नदीच्या पूरपाण्याने तात्पुरता केलेला रस्ता व पुल व त्याचे साहित्य वाहून गेल्याने दि .२७ सकाळ पासून नागरिक व वहानधारकांचे हाल सुरु असुण त्याना फेरा घेत चार किलोमीटर फाटा व येसगाव नं दोन यामार्गे बाजार सावंगी येथे यावे लागत असल्याने त्यांचे व शेतवस्तीवर रहात असलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा त्रास सहन करावे लागत आहे . काल व रात्री झालेल्या पावसानंतरही पावसाचा वातावरण व पाऊस सुरु आहे .

# सरसकट पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई द्या : आ. आपायु जिल्हाध्यक्ष सतीश लोखंडे

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** रविवार दिनांक 26 रोजीच्या रात्री झालेल्या मुसळधार पावसाने झोडपले असून यामुळे खुलताबाद तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे पिके पाण्यात जाऊन नुकसान झाले आहे. शेतातील उभे पिके आडवी झाली आहेत, शेतातील माती वाहून मोठं मोठी खळगे पडले आहेत, तुर, कपाशी टमाटे यांसारखी पिके हातातून गेली आहेत. शेतांमध्ये पाणी साचले आहे.रविवारी तालुक्यात रात्रभर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सुरू होता. पावसाळ्यातही असा पाऊस पडला नाही एवढा पाऊस पडला. ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी विज रात्रभर नसल्याने नागरिकांना अडचणीला सामोरे जावे लागले.सरसकट पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई द्या आप चे युवा जिल्हाध्यक्ष सतीश देवेंद्र लोखंडे, वेरूळकर यांनी सांगितले की यंदा खरिपाच्या सुरुवातीलाच पावसाने तब्बल दीड महिन्यांहून अधिक ओढ दिल्याने अगोदरच दुबार पेरणी सारख्या संकटाला सामोरे जावे लागले होते. त्यातच आताही या अवकाळी पावसामुळे रब्बी पिके पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे कापूस, तूर, टमाटे यांसारखे उभे पिके आडवे झाली आहेत. तरी महसूल प्रशासनाने लवकरात लवकर पंचनामा शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ मदत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आम आदमी पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष श्री सतीश देवेंद्र लोखंडे,वेरूळकर यांनी केली आहे. मागील वर्षीही असाच अवकाळी पाऊस मागील वर्षीही अतिवृष्टीमुळे तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शेतातील उभे पिके आडवी झाली होती, शेतातील माती वाहून मोठं मोठी खळगे पडले होते यामुळे वर्षानुवर्षे कर्जाच्या खाईत लोटलेला शेतकरी पुन्हा एकदा या अस्मानी संकटाला सामोरे जात आहे. व त्याबाबतची नुकसान भरपाईची रक्कम देखील अजून पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात आलेली नाही शेतकरी तहसील कार्यालयाच्या फेऱ्या मारत आहे.व आता पुन्हा निसर्गाने अवकाळी फटका दिला शासनाने याची दखल घेऊन तातडीने सरसकट पंचनामे करून मदत द्यावी अशी मागणी आम आदमी पार्टी चे युवा जिल्हाध्यक्ष सतीश लोखंडे यांनी केली आहे.

# मराठा समाजाची बुलंद तोफ मनोज जरांगे पाटील ३ डिसेंबरला धुळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हाभरातुन एक लाख समाज बांधव येणार धुळे-धुळे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी घरावर तुळशीपत्र ठेवून समाजाला एकजुट करणारे मराठा समाजाची बुलंद तोफ, मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील सध्या समाज एकत्रीकरणासाठी संपुर्ण महाराष्ट्रभर दौरे करत आहेत. धुळे जिल्ह्यात देखील आरक्षणाची मागणीमाठी आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला उभारी देण्यात कार्यकत्यांना पाठबळ देण्यासाठी मनोज जरांगे पाटील ३ डिसेबर रोजी धुळे शहरात येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत शहरात जाहिर सभा भगतसिंग चौक, फाशीपुल या प्रस्तावित ठिकाणी होणार आहे. या सभेच्या अनुषंगाने सकल मराठा समाजाच्या वतीने युध्द पातळीवर तयारी सुरु झाली आहे. मराठा समाजाची आरक्षणाची मागणी आता अत्तीम टप्पावर आलेली आहे. जालना जिल्ह्यातील अंतरावली सराटी येथुन मनोज जरांगे पाटील या लढवय्या तरुणाने संपूर्ण समाजात आरक्षणाच्या मागणीची ज्योत प्रज्वलीत केली आहे. आता हह्माच्या मागणीसाठी संपूर्ण समाज देखील पेटुन उठला आहे. समाजाच्या आरक्षण मागणीच्या आंदोलनाला अधिक सक्षम करण्यासाठी मनोज जरांगे पाटील हे संपुर्ण राज्यभरात दौरा करत आहेत. त्यांचे विचार जिल्ह्यातील जनमाणसा पर्यंत पोहचावे या उद्देशाने जिल्ह्यातील सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळान रविवारी छत्रपती संभाजी नगर येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यांना या वेळी जिल्ह्यात येण्याचे निमंत्रण दिले. या वेळी मनोज जरांगे पाटील यांनी धुळे जिल्ह्यात येण्यास होकार दर्शवला. मनोज जरांगे पाटील हे दि. ३ डिसेंबर रोजी शहरात येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत शहरान ३ डिसेबर रोजी दुपारी १ वाजेला फाशीपुल भगतसिंग चौकात भव्य अशी जाहिर सभा आयोजीन करण्यात येणार आहे. मनोज जरांगे पाटील यांची आता राज्यात नव्हे तर देशभर ओळख आहे. मध्या राज्यभरात ते जेथे जात आहेत, त्या ठिकाणी भव्य स्वागत होत आहे. त्याच तोलामोलाचे स्वागत आणि सभा धुळे शहरात देखील करण्याचे नियोजन सकल मराठा समाजाने केलेले आहे. पहिल्यांदाच मनोज जरांगे पाटील शहरात येत असल्याने शहरासह जिल्हाभरातुन किमान एक लाख समाजबांधवाची विशेष करून मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती राहणार आहे.

# चिमुकल्यांकडून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारतीय संविधान दिनानिमित्त वरिष्ठ कार्यालयाकडून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये तथा शाळा महाविद्यालयांमध्ये संविधान दिन साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या आदेशाचे पालन करीत जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, सरपंच प्रतिनिधी साहेबराव शिखरे, माजी सरपंच कैलास गोडबोले, आनंद गोडबोले, मारोती चक्रधर, मनिषाताई गच्चे, हैदर शेख आदींची उपस्थिती होती.


भारतीय संविधान दिनानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे यांच्या मार्गदर्शनानुसार संविधान दिन साजरा करण्यात आला. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाच्या प्रतीचे पुष्पपूजन करुन अभिवादन करण्यात आले. तसेच गावातील मुख्य रस्त्यावरुन संविधान रॅली काढण्यात आली. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.

# 'भूकंप, 'सौर्यिक परिस्थिती' मुळे २०२४ चा दुष्काळ, धुके आणि हुडहुडी' : प्रा. जोहरे

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** भारताला तीव्र भुकंपाचा धोका कायम आहे, महाराष्ट्रात हातपंप व विहीरी कोरड्या झाल्याने दुष्काळ तीव्रता वाढते आहे, टॅक्टॉनिक प्लेटसच्या घर्षणातून बाहेर पडलेले बाष्प धुक्यात परिवर्तित होत आहे तसेच थंडी बरोबर हुडहुडी, पुन्हा तापमानात चढउतार हे बदल पहायला मिळणार आहेत. थंडी, धुके, भुजलसाठा घटत दुष्काळाची तीव्रता वाढणे आणि आगामी काळात तीव्र भुकंपाची शक्यता यांचा परस्परांशी संबंध निर्माण झाला आहे. यावर अधिक गांभीर्याने जनहितासाठी संशोधन करीत सतर्क राहणे आवश्यक आहे. अन्नसुरक्षा व राष्ट्रीय अर्थव्यवस्था मजबुतीसाठी शेती एकजुटीने नियोजन गरजेचे आहे. येणाऱ्या आपत्तीला गांभीर्याने घेत कृतीशील उपाययोजना आवश्यक व अपरीहार्य आहेत. थोडक्यात 'भुकंप, दुष्काळ, धुके आणि हुडहुडी' धोका कायम आहे व धैर्याने तोंड देण्यासाठी सतर्कतेने न घाबरता आपण शाळा महाविद्यालय तसेच घराघरातून तयार रहायला हवे. सुमारे १०० दिवसाचा काउंटडाऊन सुरू झाला आहे असे शास्त्रीय विश्लेषण, याआधी किमान वीसपेक्षा जास्त वेळा आपल्या 'सिक्रेट इलेक्ट्रॉनिक्स उपकरणां'च्या मदतीने भुकंपाची अचूक आगाऊ अलर्ट जनहितासाठी देत नागरिकांचे प्राण वाचविणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हवामान शास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी सांगितले. दुष्काळाचा सामना करण्यासाठी व शेती जगविण्यासाठी, घराघरांतून पाणीबचत व पाणी गळती साठी उपाययोजना अत्यंत तातडीने आवश्यक आहेत असे ही प्रा.जोहरे यांनी सांगितले.



नोव्हेंबरमध्ये, महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागांमध्ये हिवाळ्याच्या हंगामामुळे थंड तापमानाचा अनुभव येतो. कारण पृथ्वीचा आस हा साडे तेवीस अंश कललेला आहे. या भौगोलिक कारणाने नोव्हेंबरमध्ये, भारतासह उत्तर गोलार्ध सूर्यापासून दूर झुकलेला असतो परिणामी थेट सूर्यप्रकाश कमी पोहोचतो तसेच रात्र मोठी व दिवस लहान असल्याने तापमानात देखील सायंकाळी घसरण होते व थंडीने हुडहुडी भरते. विशेष म्हणजे धुक्याचे ढगांत रूपांतर होत पुन्हा थंडी कमी होणे आणि ढग विरल्यानंतर पुन्हा थंडीने हुडहुडी असे चक्र महाराष्ट्र व भारतातील विविध राज्यांत यावेळी असणार आहे. यंदा थंडीचा कालावधी हा कमी असेल आणि साधारणतः २०२४ च्या फेब्रुवारी व मार्चपासून पुन्हा पाऊस व एक्सटेंडेड मान्सून आणि २०२४ मध्ये 'सौर्यिक परिस्थिती'मुळे दुष्काळाला सामोरे जावे लागेल, महाराष्ट्रातील वातावरणात आर्द्रतेत वेगवान बदल होत आहेत. सध्या आद्रतेत घट झाल्याने बोचरी थंडी जास्त जाणवेल, तसेच सकाळ सायंकाळ हुडहुडी जाणवेल. महाराष्ट्रात तापमानात घट, धुके तसेच विखुरलेल्या स्वरूपात ढगाळ वातावरण राहू शकेल असे ही प्रा. किरणकुमार जोहरे सांगितले.

**का वाढली आहे दुष्काळाची तीव्रता?**

महाराष्ट्रात हातपंप व विहीरी कोरड्या झाल्याने दुष्काळ तीव्र बनला आहे . कारण टॅक्टॉनिक प्लेटसच्या गतिशीलतेने पाणी भेगातून अधिक खोलवर झिरपून भुमिगत जलप्रवाहाची दिशा बदलली आहे . पुढील किमान १०० दिवस हिमालयाच्या रांगेत व पायथ्याशी जम्मू काश्मीर, लेह लडाख, उत्तराखंड, दिल्ली, उत्तर भारत, नेपाळ, भूतान, पाकिस्तान, अफगाणिस्तान, दक्षिण चीन तसेच ईशान्येकडील सात राज्यासह भारताला तीव्र व प्राणघातक भुकंपाचा धोका कायम आहे . तसेच महाराष्ट्राला देखील भुकंपाचा धोका कायम आहे .

**भुकंप धोक्याचा प्रदेश!**

कोयना परीसर तसेच उत्तर व मध्य महाराष्ट्र व गुजरात राज्यसीमारेषा, कच्छचा प्रदेश येथे मोठ्या भुकंपाची धोका कायम असून आपत्ती व्यवस्थापन दलाने तसेच भारतीय जनतेने न घाबरता येत्या काळातील भुकंपाचा मुकाबला धैर्याने करण्यासाठी सतर्क राहणे आवश्यक आहे असे आवाहन त्यांनी केले . तसेच आपल्या सिक्रेट इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांवर डेटाच्या विश्लेषणातून शास्त्रीय निष्कर्ष देखील जनहितासाठी प्रा . किरणकुमार जोहरे यांनी सांगितले .



# रांजणगाव शिवनेरी येथे क्रिकेट सामन्याचे बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील रांजणगाव शिवनेरी चारमळी येथील भव्य क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना पार पडून बक्षीस वितरण करण्यात आले आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना रांजणगाव शिवनेरी येथील संघाने जिंकून प्रथम पारितोषिक पटकावले आहे. तर तळेगाव संघाने उपविजेता पद पटकावले आहे. या स्पर्धेला १४ नोव्हेंबर पासून सुरुवात झाली होती. यासाठी प्रथम पारितोषिक भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा माजी पंचायत समिती सदस्या सौ. ऐश्वर्या अभिषेक पा. गाडेकर यांच्या वतीने रू. 17000 ठेवण्यात आले होते. तर द्वितीय पारितोषिक रांजणगाव च्या सरपंच संगीता कोंडके व जातेगावच्या सरपंच सरला दानवे यांच्या वतीने रू. 12000 ठेवण्यात आले तर तृतीय पारितोषिक संकल्प प्रॉपर्टीचे अभिजित गाडेकर यांच्याकडून रू. 6000 तर चतुर्थ पारितोषिक जातेगव चे माजी सरपंच शेषराव दानवे यांच्या वतीने रू.1100 ठेवण्यात आले होते.

रविवार रोजी अंतिम सामना पार पडला असून हा सामना अतिशय रोमांचक झाला असून शेवटच्या चेंडूपर्यंत सामना चालला व यात रांजणगाव च्या संघाने तळेगाव संघावर मात केली आहे.. या क्रिकेट स्पर्धेत तालुक्यातील विविध गावातील क्रिकेट संघ सहभागी झाले होते.

क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना संपन्न झाल्यावर बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा माजी पंचायत समिती सदस्या सौ. ऐश्वर्याताई अभिषेक पा. गाडेकर, वडोदबाजार चे उपसरपंच तथा भाजपा तालुका सरचिटणीस गोपाल वाघ, रांजणगावच्या सरपंच संगीताबाई कोंडके, जातेगावच्या सरपंच सरलाताई दानवे, जातेगावचे माजी सरपंच शेषराव दानवे, अभिषेक गाडेकर, कडूबा म्हस्के, अभिजित गाडेकर, योगेश काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



# राष्ट्रवादी काँगेस (अजित पवार गट)च्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** राष्ट्रवादी काँगेसच्या फुटीनंतर त्याचे थेट पडसाद धर्माबादच्या राजकारणावर पडले आहेत. माजी नगराध्यक्ष कै. विनायकराव कुलकर्णी यांनी मुंबई गाठत अजित पवार यांची भेट घेऊन त्यांच्याशी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला होता.अजित पवार गटाला बळ देण्यासाठी त्यांनी संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित केले होते. मात्र त्यांचा आकस्मिक मृत्यू झाला.आणि या प्रक्रियेला खीळ बसली होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार गट ) जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांनी संघटना बांधणीवर जोर दिला आहे. त्यांनी नुकतीच धर्माबादची कार्यकारणी जाहीर केली असूनही तालुका अध्यक्षपदी दिपक पाटील चोळाखेकर कार्यध्यक्ष बालाजी पाटील आलूरकर यांची निवड केली आहे. तर जिल्हा उपाध्यक्षपदी म्हणून तालुक्यातील ज्येष्ठ नेते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राम पाटील बन्नाळीकर यांची निवड घोषित केली आहे. याशिवाय युवक आघाडी विधानसभा अध्यक्ष पदी नागेंद्र पाटील चोळाखेकर तर युवक तालुका अध्यक्षपदी शिवाजी जाधव पाटोदेकर यांची वर्णी लागली आहे.

या निवडीमुळे पक्षाला बळ तर मिळेलच पण येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची समीकरणावर ही याचे पडसाद पडतील अशी चर्चा राजकीय विश्वात आहे.



# आनंदी क्षण देऊन जय अनंत महोत्सवाचा समारोप

## तब्बल ५३ लाख रुपयांची विक्रमी उलाढाल

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** माजी खासदार तथा माजी मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अनंतराव देशमुख व त्यांच्या सुविद्य सहचारिणी सौ. जयाताई अनंतरव देशमुख यांच्या नावाने त्यांचे सुपुत्र रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे युवा नेते ऍड नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या जय अनंत महोत्सवाचा नुकताच समारोप झाला आहे. एक आनंदाचा सोहळा म्हणुन गेल्या तीन वर्षांपासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. एक आनंदाची पर्वणी ठरलेल्या या कार्यक्रमात सतत तीन दिवस रिसोड मालेगाव तालुक्यातील हजारो लोक या महोत्सवात सहभागी होतात आणि आणि आनंदी क्षणाची अनुभूती घेतात. दरम्यान या कार्यक्रमात विवीध सांस्कृतिक कलांचे सादरीकरण करण्यात येते. तद्वतच वेगवेगळे खाद्य पदार्थ आणि हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात येत असते. यानिमित्ताने सदर महोत्सवात तब्बल ५३ लाख रुपयांची उलाढाल झाली असून, अलोट गर्दीच्या साक्षीने नुकताच जय अनंत महोत्सवाचा समारोप झाला आहे. ॲड.नकुल देशमुख यांच्या संकल्पनेतून साकार झालेला जय अनंत महोत्सव २०२३ वर्ष ३ रे, उत्सव महाराष्ट्रीयन कला संस्कृतीचा या अंतर्गत रिसोड मालेगाव तालुका व परिसर मधील असंख्य लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाच्या अनुभवाचे क्षण देऊन सदर महोत्सवाचा समारोप झाला. जय अनंत महोत्सव २०२३ चे यावर्षी तिसरे वर्ष होते उत्सव महाराष्ट्रीयन कला संस्कृतीच्या अंतर्गत यावर्षी शिवकालीन शहरा आणणारे प्रसंग, महाराष्ट्राची संत परंपरा व वारकरी संप्रदाय, महाराष्ट्र व देशातील विविध नृत्यप्रकार, व इतर अनेक कला सादरीकरण, इतिहासकालीन शस्त्र प्रदर्शनी तसेच अनेक दैनंदिन उपयोगाच्या व सर्वांच्या रोजनिशीच्या जीवनातील वस्तू चविष्ट खाद्यपदार्थ यांच्या विक्रीवर आस्वाद घेत या तीन दिवसीय महोत्सव दरम्यान हजारो परिवारांनी असंख्य लोकांनी भेट देत आनंदाचे क्षण अनुभवात या महोत्सवाचा आनंद लुटला. शिस्तबद्ध नियोजन, स्वच्छता, तितक्याच प्रमाणात कला सादरीकरण करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या कलेत भरलेला जोरदार अभिनय यांनी लोकांची मन जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील काही प्रसंगाचे अंगावर शहर येणारे सादरीकरण अतिशय उत्कृष्टपणे सादरीकरणामुळे लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. मोठ्या प्रमाणामध्ये प्रशासकीय अधिकारी, विविध पक्षाचे पदाधिकारी, गोरगरीब, जनसामान्य, पत्रकार, विविध क्षेत्रातील नावलौकिक असलेले व्यक्तिमत्व यांनी या तीन दिवसीय महोत्सवादरम्यान भेट देऊन ॲड.नकुल दादा देशमुख यांच्या संकल्पनेचे व नियोजनाचे भरभरून कौतुक केले व आपल्या परिवारासहित या महोत्सवाचा मनःपूर्वक आनंद लुटला. यावेळी महोत्सवा दरम्यान अतिशय शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. ॲड.नकुल देशमुख यांनी प्रत्येक नियोजनावर बारकाईने लक्ष देत हा महोत्सव यशस्वी करून दाखवला मागील दोन वर्षाच्या यशस्वी नियोजन नंतर याही वर्षी हजारोच्या संख्येने अनेक परिवारांनी व नागरिकांनी या महोत्सवाचा आनंद घेतला. सौ.अमृताताई यांनी महोत्सवातील प्रत्येक नियोजनात गुणवत्ता व कला सादरीकरण यशस्वी होण्यासाठी नियोजन केले होते त्यांच्या या नियोजनास सादरीकरणाच्या माध्यमातून लोकांची मन जिंकून यश आले. यावेळी कार्यक्रमादरम्यान माजी मंत्री अनंतराव देशमुख,सौ.जयश्री ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनात हा महोत्सव पार पडला.प्रत्येक कलाकृती सादरीकरण नाटिकेस व सर्व स्टॉल धारकांना ॲड.नकुल देशमुख यांनी भेट देऊन चौकशी केली.



**तब्बल ५३ लक्ष रुपयांच्या पदार्थ व वस्तू विक्रीची उलाढाल :** शिस्तबद्ध नियोजन काटेकोर व्यवस्था पुरवण्यात आलेल्या सुविधा व असंख्य हजारोंच्या संख्येने येणाऱ्या परिवार व जनतेने घेतलेला मनमुराद आनंद व विविध खाद्यपदार्थ व वस्तू यांचा विक्री तब्बल 53 लक्ष रुपये च्या दरम्यान झाले असून हा महोत्सवा दरम्यान झालेल्या आर्थिक उलाढालीचा विभागातील उच्चांक आहे . ॲड . नकुल देशमुख यांनी स्थानिक बचत गट, समूह, व्यावसायिक ,दुकानदार छोटे व्यवसायिक यांना स्टॉलसाठी प्राधान्य दिले होते . एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या विक्रीमुळे व त्याच पद्धतीने या अनंत महोत्सवाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात झालेल्या प्रचार प्रसारामुळे स्टॉल धारकांनी आनंद व्यक्त करून, ॲड . नकुल देशमुख यांचे संकल्पनेतून साकार झालेल्या या महोत्सवाचे कौतुक करून अतिशय सुंदर अशा नियोजनाबाबत भरभरून कौतुक केले . अशाप्रकारे अलोट गर्दी जोरदार वस्तू व पदार्थ विक्री व हजारोच्या संख्येने येणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंदी क्षणाचे अनुभव देऊन जय अनंत महोत्सव 2023 चा समारोप झाला . ॲड .नकुल देशमुख यांचे नियोजन व मार्गदर्शनात दि आर्य शिक्षण , कृषी महाविद्यालय व ॲड .नकुल दादा देशमुख मित्रमंडळ यांनी महोत्सव यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले .

# धनगर आरक्षणप्रश्नी उपोषणकर्ते गणेश केसकर आक्रमक

## लोणंदच्या इशारा मेळाव्यातून जाळला जी आर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** धनगर आरक्षणप्रश्नी लोणंद ता.खंडाळा येथे आमरण उपोषणास बसलेले उपोषणकर्ते गणेश केसकर यांच्या आंदोलनाची दखल राज्यशासन घेत नाही. त्यामुळे राज्य शासनाला इशारा देण्यासाठी उपोषण स्थळी इशारा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मेळाव्यास धनगर बांधव उपस्थित होते. अनेक बांधवांनी मनोगते व्यक्त केली. इशारा मेळाव्यास  उपोषण कर्ते गणेश केसकर यांनी संबोधित करत असताना शासनाने काढलेल्या धनगर आरक्षण प्रश्नी जी आर वर सडकून टीका केली.महाराष्ट्र शासनाकडून काढण्यात आलेल्या जी आर च्या प्रती जाळण्यात आल्या. यावेळी समस्त धनगर बांधवांनी येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष केला.यावेळी उपोषण कर्ते गणेश केसकर म्हणाले की,आपण धनगर आरक्षण बद्दल असलेल्या घडामोडींवर लक्ष ठेवून नाही.जी आर आला.२० नोव्हेंबर २०२३ रोजीचा हा जी आर आहे.याच्या मध्ये लिहिलं आहे,धनगर समाजाचा अनुसूचित



जमातीमध्ये समावेश करून आरक्षणाच्या मागणीच्या अनुषंगाने शिष्टमंडळ अभ्यासगट स्थापन करण्याबाबत...
आपण समावेशाची मागणी करत आहोत का? मंत्रालयातून फोन आला की तुमच्या काही दुरस्त्या असतील तर आम्हाला लिहून पाठवा.२१ तारखेला दुरुस्ती संदर्भात लिहून पाठवलं.आजतागायत या महाराष्ट्र शासनाने जी आर दुरुस्त केला नाही. या जी आर चं करायचं काय? अरे आग लाव या जी आर ला,आग लावा,पेटवा ती जी आर,होळी करा त्याची अशी आक्रमता गणेश केसकर यांनी धारण केली.यानंतर येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत जी आर च्या प्रती जाळण्यात आल्या.ड चं र करा ही दुरुस्तीची आमची मागणी असताना सुद्धा राज्य सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने उपोषणकर्ते गणेश केसकर यांच्याकडून आक्रमक भूमिका घ्यावी लागत आहे. जी आर बाबत उपोषणकर्ते गणेश केसकर म्हणाले की,एवढा चुकीचा जी आर काढताय,फक्त घनश्याम बापू हाके रस्ता अडवत आहेत.बाकी सगळी धनगर बांधव बघत बसता.अरे राग कसा येत नाही.खरच धनगराची औलाद आहे का? चुकीचं तुमच्या तोंडात घातलं जातंय.आणि गप्प खाताय,गप्प गिळताय आणि डॉक्टरकडे जाताय,म्हणताय माझं पोट बिघडलं.मग खरच प्रश्न पडतो की काय आपला मेंदू गुडग्यात आहे की काय? हे महाराष्ट्र शासन जर जी आर बदलू शकत नाही. तर तुम्हाला झोपा कशा येतायत? तुम्हाला झोप लागती कशी? माझ्या पोराचं ऍडमिशन झालं नाही म्हणून तुम्हाला झोप लागत नाही.इथे सत्तर वर्षाची लढाई फक्त ड आणि र हे पण आपलं दुखणं आहे ना? असे सुद्धा गणेश केसकर यांनी म्हटले.

# भूतबाधेची भीती दाखवून महिलेला लुटले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** घरावर दुष्ट आत्म्याचा प्रभाव असल्याची भीती दाखवून तीन भोंदूबाबा एका महिलेला फसवत होते. तंत्र-मंत्राने घरातील ब्रम्हराक्षसाला पळवून लावण्याची बतावणी करीत महिलेकडून सोन्याचे दागिने आणि रोकड असा १२ लाख रुपयांचा माल तीन भोंदूबाबांनी उकळला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्यांना याची माहिती मिळाली. त्यांनी दोन आरोपींना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. हे प्रकरण हुडकेश्वर ठाण्यांतर्गत उघडकीस आले. पोलिसांनी रश्मी विजय पानबुडे (३८) रा. बँक कॉलनी, मानेवाडा रोड, यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला. ईश्वर उर्फ इंद्र पप्पू शर्मा (३५), सुनील पप्पू शर्मा (३८) आणि साहिल चिरौंजीलाल भार्गव (१९) सर्व रा. ओमकारनगर, अशी आरोपींची नावे आहेत. नोव्हेंबर २०१६ मध्ये रश्मीचे प्रज्ञदीप बोरकर यांच्याशी लग्न झाले होते. काही दिवसातच दोघांमध्ये भांडणे होऊ लागल्यामुळे पतीने त्यांना माहेरी सोडले. रश्मीने पतीविरुद्ध घरगुती हिंसाचाराची तक्रारही दाखल केली. २००३ मध्ये रश्मीच्या वडिलांचे निधन झाले. २०२१ मध्ये आईचेही निधन झाले. लहान बहीण दीप्ती सावंत नागपुरात राहते. २०१८ मध्ये रश्मी आणि प्रज्ञदीपचे समुपदेशन सुरू होते. या दरम्यान एका परिचिताने ईश्वर शर्मा बाबत सांगितले आणि भेट घालून दिली. ईश्वरने पूजा-पाठ आणि मंत्राच्या शक्तीने भूतबाधा दूर करीत असल्याची माहिती दिली.

# बुलढाण्यात रात्रभर संततधार, गारपीट अन् सोसाट्याचा वारा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** कृषिप्रधान बुलढाणा जिल्ह्यातील लाखो शेतकरी व रहिवाशांना रविवारी रात्रभर निसर्गाचे भीषण तांडव अनुभवायला मिळाले. विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा, गारांचा वर्षाव यासह मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या तेराही तालुक्यात हजेरी लावत पिकांची नासाडी केली. शेडनेटचे देखील नुकसान झाले असून अनेक गावांत रात्रीपासून खंडित झालेला वीज पुरवठा सुरळीत झालाच नाहीये. जिल्ह्यातील तेराही तालुक्यात २६ नोव्हेंबरच्या रात्री पावणेदहाच्या सुमारास पावसाला प्रारंभ झाला. काही ठिकाणी मुसळधार, काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस कोसळला. हा पाऊस अधूनमधून विसावा घेत आज, सोमवारी सकाळपर्यंत सुरूच होता. देऊळगाव राजा, लोणार, सिंदखेडराजा आदी तालुक्यात संमिश्र आकाराच्या गारांनी रब्बी पिके व शेडनेटचे अतोनात नुकसान केले. रातभर कोसळणाऱ्या पावसाने कपाशी, बहरात आलेल्या तूर, मका, भाजीपाला, फळबागा चे प्रचंड नुकसान झाले आहे. रात्रीपासून पाऊस सुरु असून हवेत प्रचंड गारवा निर्माण झाला आहे.



# संविधान दिनी डॉ. बाबासाहेबांना हंसराज अहीर यांनी वाहिली आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** 26 नोव्हेंबर 1949 हा दिवस स्वतंत्र भारतासाठी मोठा ऐतिहासिक दिवस होता. तो समस्त भारतीयांसाठी सोनेरी क्षण सुध्दा होता. संविधानाचे जनक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला याच दिवशी संविधान सोपविले होते व संविधान सभेने विधीवत स्वरुपात स्वीकारत देशाला संविधान समर्पित केले. या संविधानाने लोकशाहीची पुनर्स्थापना करीत देशात समानता, न्यायहक्क, बंधुभाव दिला आहे. आज संविधान हा राष्ट्रीय दिन म्हणुन साजरा होत असल्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी सांगतानाच उपस्थितांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रधानमंत्री मान. नरेंद्र मोदी यांनी सन 2015 मध्ये संविधान दिवस साजरा करण्याचा निर्णय घेवून भारतीय संविधानाबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनात जबाबदारीची भावना निर्माण केली आहे असे ते म्हणाले. सुरुवातीला हंसराज अहीर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहुन संविधानाप्रती सन्मान व निष्ठा राखण्याचे सर्वांना आवाहन केले. याप्रसंगी खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, रवि गुरनूले, धम्मप्रकाश भस्मे, ॲड. राहुल घोटेकर, राजेंद्र अडपेवार, सविता कांबळे, रेणुका घोडेस्वार, स्वप्निल कांबळे, राहुल सुर्यवंशी, शीलाताई चव्हाण, शीतल गुरनुले, श्याम कनकम, किरण बुटले, राहुल सुर्यवंशी, स्वप्निल मुन, दिनकर सोमलकर, राजेश थुल, विठ्ठल डुकरे, सचिन कोतपल्लिवार, रवि लोणकर, राजेंद्र खांडेकर, प्रलय सरकार, अनिल सुरपाम, चंदन पाल, चांद सय्यद, अमित निरांजने, जहीर रजा, विक्की मेश्राम, राहुल नगराळे, जितेंद्र वाकडे, सुनिल महातव यांचेसह भाजपा पदाधिकारी व विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# युवक काँग्रेसच्या वतीने प्रशासकीय सेवेतील नारी शक्तीचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दिनांक २४ नोव्हेंबर रोजी लोणार स्व. इंदिरा गांधी जयंती निमित्त महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे यांच्या संकल्पनेतून शक्तीसुपरशी व इंदिरा फेलोशिप या कार्यक्रमाचे आयोजन बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अनिकेत मापारी यांच्या मार्गदर्शनात लोणार शहर युवक काँग्रेसच्या वतीने प्रशासकीय सेवेतील नारी शक्तीचा सन्मान करण्यात आला. यावेळी लोणार नगरपालिकेचे सफाई कर्मचारी, अंगणवाडी सेविका, पोलीस कर्मचारी व अन्य प्रशासकीय सेवेतील महिलांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह स्वर्णपदक देऊन त्यांचा मानसन्मान करण्यात आला.यावेळी लोणार शहराच्या नगराध्यक्ष सौ.पूनम पाटोळे,ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अमोल सोनुने, शहराध्यक्ष विकास मोरे, सागर मापारी,सोशल मीडियाचे मोसिन शहा, शेख सज्जाद शेख करामत, एन. एस. यु .आय जिल्हा सरचिटणीस ओम पाटोळे, योगेश जाधव, अमोल मापारी, गणेश मापारी, केतन बाजाड, शुभम चाटे, सुनील साठे, महेश घाटोळे, उपस्थित होते.

# भडजी-ममनापूर सरपंच अविश्वास प्रस्ताव बारगळला

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :**तालुक्यातील मौजे भडजी -ममनापूर ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच बाबासाहेब कारभारी वाकळे यांच्या विरुद्ध ९पैकी७ सदस्यांनी तहसीलदार यांच्या कडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्यासाठीं विशेष सभेचे आयोजन ही करण्यात आले होते परंतु सातही सदस्य प्रक्रिया दरम्यान गैरहजर राहिले व सरपंच हाजर त्यामुळे अविश्वास प्रस्ताव बारगळला व सरपंचपद कायम राहीले. सोनाली वाकळे, ज्ञानेश्वर गवळे, निर्मला वाकळे, संजय सोनवणे, भानुदास जाधव, अश्विनी अक्कर, केशरबाई घोडके आदि ९पैकी७सदस्यांनी तहसील कार्यालय मा तहसीलदार यांच्याकडे सरपंच बाबासाहेब कारभारी वाकळे यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता तहसीलदार स्वरुप कंकाळ यांनी अविश्वास प्रस्ताव प्रक्रियासाठी दि २४रोजी विशेष सभा बैठकीचे आयोजन केले होते. मात्र प्रक्रिया तथा वेळा दरम्यान सरपंच वगळता कोणताच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित नसल्याने सरपंचाच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव बारगळला. त्यामुळे सरपंच पद तसेच कायम राहीले. ग्रामसेवक पवार, तलाठी मनिषा कदम यांनी काम हाताळले. याप्रसंगी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# तरडगाव येथे संविधान दिन साजरा

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**तरडगाव :** भारतीय संविधानाचा विजय असो हा जयघोष करत तरडगाव, ता.फलटण येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय संविधान दिन हा अनोख्य पद्धतीने साजरा करण्यात आला.
या दिनाचे औचित्य साधून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.यावेळी सरपंच जयश्री चव्हाण,उपसरपंच प्रशांत गायकवाड,ग्रामपंचायत सदस्य संतोष कुंभार,तनुजा गायकवाड,अतुल गायकवाड,विकास सेवा सोसायटीचे व्हाइस चेअरमन महावीर शहा, संदीप शिंदे,तानाजी कुलाळ,धोंडीराम मदने, ऋषीकेश चव्हाण,अंगणवाडी सेविका तृप्ती देशपांडे, प्रेरणा कुंभार, रोहिणी कानडे व अंगणवाडी मदतनीस तनुजा कुंभार, चतूरा मुळीक, सारिका कानडे, ज्योती अडसूळ तसेच ग्रामपंचायत कर्मचारी गोरख मदने, राजेंद्र मोरे, जितेंद्र अडसूळ, सागर अडसूळ आदी उपस्थित होते.
यावेळी संविधानाचे अभ्यासक व लेखक नूरखा पठाण यांनी लिहिलेले भारतीय संविधानावर आधारित असलेले "आपलं संविधान... राज्यपद्धती नव्हे,तर जीवनपध्दती "हे पुस्तक पत्रकार सुशिल गायकवाड यांच्याकडून ग्रामपंचायतीस भेट देण्यात आले. तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिका सुद्धा ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी,अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस आदींना देण्यात आल्या. उपसरपंच प्रशांत गायकवाड आणि ग्रामपंचायत सदस्य संतोष कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रशांत गायकवाड म्हणाले की,खऱ्या अर्थाने प्रत्येक दिवस हा संविधान दिवस म्हणून संपूर्ण भारतात त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आजच्या काळात संविधानाची खूप गरज आहे.बऱ्याचशा अशा काही गोष्टी आहेत की त्या संविधान सोडून चालू आहे. संविधानाची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात सरकारने केली पाहिजे.ग्रामपंचायत सदस्य संतोष कुंभार म्हणाले की, २६ नोव्हेंबर १९४९ ला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला आणि राष्ट्राला संविधान समर्पित केलं. भारतीय लोकशाहीचा एवढा मोठा डोलारा ज्या संविधानावर आधारित आहे. ते संविधान आपल्यासाठी अतिशय प्रार्थनिय असलं पाहिजे. रोजच्या जीवनात संविधानाचा वापर केला पाहिजे. लोकशाहीमध्ये जे आपल्याला व्यक्ति स्वातंत्र्य आहे. समानता बंधूता आणि अभिव्यक्तीचे जे स्वातंत्र्य आहे. ते आपल्याला बाबासाहेबांच्या मुळे मिळालेले आहे.



# शहर वाहतूक शाखेची दुचाकीस्वारांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात वाढत्या गुन्हेगारीमुळे लक्षात घेता मा.पोलीस अधीक्षक धिवरे यांनी शहर वाहतूक शाखेचे मा. भूषण कोते यांना आदेश केले की शहरातील विना नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट, जास्तीचे आवाज करणारे सायलेन्सर व धमाके करणारे सायलेन्सर अशा प्रकारच्या दुचाकी वाहनांवर तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात सांगितले त्याचं प्रमाणे 11 ते 12 वाजे दरम्यान जय हिंद सिनिअर कॉलेज चौकात विदाऊट नंबर, ब्रोकर नंबर, फटाके फोडणाऱ्या बुलेट अशा 10 मोटरसायकल धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान सपोनी भूषण कोते असइ जितेंद्र आखाडे, हवलदार भागवत पाटील, भूषण जगताप पोलीस कॉन्स्टेबल विवेक वाघमोडे, विलास मालचे, तोसिफ शेख चालकपोना मतीन शेख, प्रसन्न कुमार पाटील असे हजर होते.



# रयत क्रांती संघटनेकडून राज्य सरकारचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** अल्फा दुध डेअरी परतुर गाव दसमले चौक येथे रयत क्रांती संघटनेचे वतीने शासनाचा जीआर जाळून शासनाचा निषेध करण्यात आला, नामदार सदाभाऊ खोत साहेब यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये करण्यात येत आहे, शेतकऱ्याच्या दुधाला चांगला भाव मिळाला पाहिजे याकरता हे आंदोलन करण्यात आले आंदोलन दुध उत्पादक शेतकरी अडचणीत असताना राज्य सरकार दूध उत्पादक शेतकरी ची जखमेवर मीठ चोळन्याचे काम राज्य सरकार करत आहे. महाराष्ट्र राज्य  मध्य सध्या दुषकाल स्तिती आहे. राज्य सरकार शेतकरीच्या अंत पाहू नये ,नसता तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष जालना व संपर्कप्रमुख नांदेड लातूर गजानन राजबिंडे पाटील यांनी राज्य सरकार दिला आहे या वेळी रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष शंकर भाडवलकर, मुळे, मारोती भाडवलकर महेश काकडे बबलू भाई रामा नरके निसारभाई दता जिगाडे कृष्णा राऊत विष्णू गोरे नारायण टेकाळे दिलीप झिझाडे सर्व दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# वादळी पावसाने म्हैस ठार, अनेक शेळ्या जखमी

## पीडित शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्या

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्याच्या पूर्व भागात घोटी खुर्द येथे अवकाळी वादळी पावसामुळे दगड मातीचे बांधकाम असलेले कौलारू घर पडल्याने या घटनेत दुधाळ म्हैस जागीच ठार झाली असून अनेक पाळीव शेळ्या गंभीर जखमी झाल्या. घरात उभी केलेली मोटारसायकल पडलेल्या घरात दाबली गेल्याने तीचेही मोठे नुकसान झाले असून घरातील अन्न धान्य, संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. शंकर यशवंत निसरड हे दुर्दैवी घरमालकाचे नाव असून कुटुंबातील सर्वजण कामानिमित्त बाहेर असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. इगतपुरीचे तहसीलदार अभिजित बारवकर यांना सामाजिक कार्यकर्ते आत्माराम फोकणे यांनी याबाबत माहिती दिली. श्री. बारवकर यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. यावेळी घोटी खुर्दचे सरपंच माणिक बिन्नोर, मंडळ अधिकारी सुयोग वाघमारे, तलाठी मनोज मोरे, कोतवाल तानाजी बर्डे, गोरख निसरड, गणपत म्हसळे आदी उपस्थित होते. संबंधित कुटुंबाला तातडीने आवश्यक ते सर्व साहाय्य द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आत्माराम फोकणे यांनी यावेळी केली. इगतपुरी तालुक्यात आज बेमोसमी पावसासह गारपीटीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. विजेच्या कडकडाटात वादळ आणि गारपीटसह जोरदार पाऊस पडला. यामुळे इगतपुरी तालुक्यातील घोटी खुर्द भागातील भात, बागायती पिके, जनावरांचा साठवलेल्या चाऱ्याचे मोठे नुकसान झाले. पंचनाम्याचा केवळ फार्स न करता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आत्माराम फोकणे यांनी केली आहे.

# आठवडी बाजारात गुरांची खरेदी विक्री सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे पुन्हा नव्याने आठवडी बाजारात गुरांचा बाजार व खरेदी विक्री व्यवहार सुरु झाले असुण शेतकरी व व्यापाऱ्यांनी दि.२४शुक्रवारी प्रत्यक्ष व्यवहार केला आहे.
करोना व तदनंतर लम्पी संसर्गजन्य गुरांच्या आजाराचा धोका वाढला होता त्यामुळे गुरांचे बाजार तथा खरेदी विक्री व्यवहार पुरता पुरती भितीमुळे बंद होते मात्र आता करोना व गुरां चे संसर्गजन्य रोग निवळले असुण आता बाजारांत खरेदी विक्री व्यवहार सुरळीतपणे सुरू झाले आहे. बाजार सावंगी आठवडी बाजार खुलताबाद तालुक्यात एक नंबर असुन छ.संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा छावणी व फुलंब्री तालुक्यातील वडोदबाजार या मोठ्या बाजारा प्रमाणे येथे गुरांचे खरेदी विक्री व्यवहार होतात जिल्ह्यांतून तथा पंचक्रोशीतील ४०-५०खेड्याचे शेतकरी व्यापारी बाजारात खरेदी व विक्री व्यवहाराकरीता येतात गुरांचा बाजार बंद असल्याने आठवडी बाजाराचा बाजार पणच गेला होता. परंतु नव्याने परत गुरांचा बाजार सुरु झाला आहे तर ग्रामपंचायतने गुरांच्या बाजारासाठी गुराचे बाजार परिसर स्वच्छ केले असुण गुरांसाठी पाणी व गुरे उभे करण्याचे जागा स्वच्छ करून दिली आहे.गुरांच्या आठवडी बाजारा प्रमाणेच हिरवा भाजीपाला व विविध दुकाना प्रतिष्ठान शुक्रवारी आठवडी बाजारात येतात जिल्हा बरोबरच पंचक्रोशीतील ४०-५० खेड्यांचे बाजारकरू येथे बाजारसाठी येतात हे विशेष.



# तुरीवर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव; शेतकरी हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**अरविंद देशमुख**

**रिसोड :** मागील पाच सहा दिवसापासून रिसोड तालुक्यात ढगाळ वातावरणामुळे तुरीवर अळ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. सद्यस्थितीत तुरीचे पीक फुले व शेंगाच्या अवस्थेत असून, या पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांनी हल्लाबोल केला आहे. बाजारातील महागडी कीटकनाशकांची फवारणी करूनही अळ्यांना अटकाव घातल्या जात नसल्याने संपूर्ण तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. मात्र या गंभीर समस्येकडे सबंधित कृषी विभाग सुस्तपणाचे सोंग करून दुर्लक्ष करत आहे. तर शेतकऱ्यांचा पुळका आणणाऱ्या विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी मूग गिळून आपापल्या कामात व्यस्त आहेत. परिणामी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची लाट उफाळली आहे.

यावर्षी अल्पवृष्टीमुळे खरीप हंगामातील सोयाबीन व इतर पिकांनी शेतकऱ्यांची फार मोठी निराशा केली आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील तूर, हरभरा, गहू आदी पिकांवरच शेतकऱ्यांची संपूर्ण भिस्त आहे. परंतु परतीचा पाणी हुलकावणी देऊन गेल्यामुळे, आणि सिंचनाची कुठलीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील हरभरा व इतर पिकांची उगवण समाधानकारक झालेली नाही.पण सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात बऱ्यापैकी पडलेल्या पावसामुळे तुरीचे पीक बऱ्यापैकी बहरले आहे. परंतु फुले व शेंगा भरण्याच्या अवस्थेत अचानक वातावरणात बदल झाला. आणि गेल्या पाच-सहा दिवसापासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या विपरीत वातावरणामुळे तुरीच्या पिकावर मोठ्या प्रमाणात अळ्यांचा प्रादुर्भाव झाला आहे. अळ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकरी बाजारात मिळणारी महागडी कीटकनाशके विकत घेऊन फवारणी करत आहेत. मात्र अळ्यांसाठी आवश्यक असलेल्या ढगाळ वातावरणामुळे अळ्यांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. पावसाअभावी यावर्षी खरिपाची पेरणी नको तेवढ्या प्रमाणात उशिरा झाली आहे. मृग नक्षत्रा नंतर पेरणी झाली तर तुर पिकावरच शेतकऱ्यांचे पुढील आर्थिक नियोजन अवलंबून असते हा सर्वश्रूत आजवरचा अनुभव आहे. परंतु फवारणी करून सुद्धा अळ्या फुलांचा फडशा असून, शेंगा पोखरत आहेत. कडधान्यांमध्ये तूर हे पीक सर्वात महत्त्वाचे पीक आहे.पण उत्पादन व उत्पादकता याचा विचार केल्यास तुरीची सरासरी उत्पादकता खूपच कमी असते. आणि आता अशी अवस्था निर्माण झाल्यामुळे पहिलेच नाकीनऊ आलेले शेतकरी पुन्हा हवालदील झाले आहेत. अशा गंभीर अवस्थेत शेतकऱ्यांची कोणीच दखल घेत नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून रोष व्यक्त केल्या जात आहे.

**संबंधित कृषी विभागाकडून एकात्मिक किडनियंत्रणाचे मार्गदर्शन होणे गरजेचे**

पिकाच्या कळी व फुलोऱ्यापासून थेट काढणीपर्यंत शेंगा पोखरणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असतो . त्या अनुषंगाने तालुक्यातील संबंधित कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन सूक्ष्म निरीक्षण करायला पाहिजे .आणि वेळप्रसंग पाहून खबरदारीचा उपाय म्हणून शेतकऱ्यांना एकात्मिक कीड नियंत्रणाचे मार्गदर्शन करणे खूप गरजेचे झाले आहे .

तुरीचे पीक पन्नास टक्के मध्ये असताना पहिली फवारणी निंबोळी अर्काची आणि त्यानंतर पंधरा दिवसांनी किडींची आर्थिक नुकसानीची पातळी लक्षात घेऊन Emamectin Benzoate 5% SG 3ग्रॅम प्रती 10 लिटर पाण्याच्या प्रमाणात किंव्हा Ethin 50% EC 25मिली 10लिटर पाणी या प्रमाणात आवश्यकतेनुसार फवारणी केल्यास बऱ्याच प्रमाणात अळ्यांना अटकाव घातल्या जाऊ शकतो .मात्र किटक नाशक किती महागडे आहे याला महत्त्व नसून, फवारणी योग्य वेळेत होणे खुप महत्वाचे आहे .

**डॉ . रविंद्र काळे, (शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र करडा )**

कोराजन, गॅस पॉयझन पशी वेगवेगळी औषधे वापरून दोन वेळा तुरीची फवारणी केली आहे . तरीसुद्धा आळ्या शेंगा पोखरत आहेत .आणि तुरीच्या पिकावरच पुढील सर्व आर्थिक बजेट अवलंबून असल्यामुळे आर्थिक चिंता वाढली आहे .

**उत्तम लिंबाजी खडसे, (शेतकरी, शेलुखडसे )**





# रसूलपुरा ग्रा.पं. उपसरपंचपदी मुसा पठाण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे रसुलपुरा येथील ग्रामपंचायत उपसरपंचपदीसाठी मुसा लालखा पठाण यांची निवड करण्यात आली.निवड होताच गावकऱ्यांना एकच जल्लोष केला व नवनिर्वाचित उपसरपंचाचे सत्कार केला. रसुलपूरा सात सदस्यी ग्रामपंचायत असुण थेट जनतेतून सरपंच एक व सात सदस्य एकुण आठ ची कार्यकारिणी आहे. (दि.२४)निवडणुक प्रक्रियेत उपसरपंच मुसा पठाण यांना ८पैकी५ मतदान मिळाले. दणदणीत विजय मिळाला.निवड होताच गावकऱ्यांनी एकच जल्लोष करत नवनिर्वाचितांचा सत्कार केला. यावेळी सरपंच अश्वनी युवराज बनसोडे उपसरंपच मुसा लालखा पठाण ग्रामपंचायत सदस्य हलीमाबी रज्जाक पठाण, साजेद हाशम पठाण हीना शौकत पठाण, माजी सरपंच सलीम खान माजी साडु पठाण, हुसैन पठाण जाकिर पठाण हैदर पठाण बनेखा पठाण रफीक पठाण, महेमुद पठाण जाकिर पठाण बाशा पठाण जमील पठाण राजु पठाण सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY





चंदुलाल मो.बियाणी

दाम दुप्पट ठेव योजना... 66 महिन्यात रक्कम दाम दुप्पट

आपल्या स्वप्नपुर्तीसाठी, आपुलकीचा हातभार...

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो. लि., परळी वैजनाथ

- बँकींग
- आरोग्य
- शिक्षण
- रियल ईस्टेट
- इन्शुरन्स

● मुख्य कार्यालय : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि.बीड मो.9130072178/9130072188
● कॉर्पोरेट ऑफिस : २०५/२०६, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर, मो.9130072176

Toll Free No : 1800 419 7501 Web : www.rajasthanimultistate.in